कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

## मतदानाचा वेळ एकतासाने कमी

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक गुरूवारी (दि.१५) पार पडणार आहे. मुंबईतील १ कोटींहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. दरम्यान, मतदानाचा वेळ एक तासाने कमी केल्यामुळे, मुंबईतील अनेक मतदान केंद्रांवर गर्दी होण्याची शक्यता आहे. मुंबई महानगरपालिकेत सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत मतदान होणार आहे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, मुंबईसह सर्व २९ नगरपालिकांसाठी ही मतदानाची वेळ आहे. मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी आणि निवडणूक अधिकाऱ्यांनी हे स्पष्ट केले. गेल्या विधानसभा निवडणुकीत सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान झाले होते.





# निवडणुकीसाठी 8500 यंत्र

■ कंट्रोल युनिटसह बॅलेट युनिट मशीनचा साठा उपलब्ध

■ जि.प.साठी ६ तर पं.स.साठी ४.५ लाख रुपये खर्चाची मर्यादा

प्रमोद जाधव

। रायगड ।

प्रदिर्घ कालावधीनंतर रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासकिय कामकाज योग्य पद्धतीने व्हावे, यासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी साडेआठ हजार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र उपलब्ध आहेत. त्यामध्ये २,५०० कंट्रोल युनिट व ५,९५० बॅलेट युनिट मशीनचा समावेश आहे. जिल्हा प्रशासन या निवडणुकीसाठी सज्ज असून त्याची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीच्या निमित्ताने बुधवारी (दि.१४) पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी जावळे बोलत होते.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत जिल्ह्यात आचारसंहिता असणार आहे. ही निवडणूक शांततेत व सूरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन यंत्रणा सज्ज झाला आहे. जिल्ह्यातील कायदा •➤ पान २ वर

### खर्चाच्या मर्यादा

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज १६ ते २१ जानेवारी या कालावधीत दाखल होणार आहे. या कालावधीत उमेदवारांना खर्चाची मर्यादा देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी ६ लाख रुपये, तर पंचायत समितीच्या निवडणूकीसाठी ४ लाख ५० हजार रुपये खर्च करण्याची मुभा देण्यात आली आहे.

### चारित्र्य हणन करणे पडणार महागात

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या कालावधीत ठिकठिकाणी सभा, बैठका होणार असून अनेक ठिकाणी रॅलीदेखील काढल्या जाणार आहेत. या निवडणुकीत आरोप प्रत्यारोप एकमेकांविरोधात केले जाणार आहेत. मात्र, चारित्र्य हणन होणार नाही. पातळी ओलांडून व्यक्तीबद्दल बोलले जाणार नाही याकडे लक्ष देण्याचे काम प्रशासनाकडून केले जाणार आहे. त्यामुळे चारित्र्य हणन करणारे भाषण करणे यावेळी महागात पडणार असल्याचे जावळे यांनी सांगितले.

### मोबाईल ॲपमधून मतदारांची माहिती

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. मतदार यादी नाव शोधण्यासाठी मतदारांचीदेखील धावपळ सुरू झाली आहे. ही धावपळ कमी करण्यासाठी निवडणूक आयोगाने सोशल मिडीयाचा आधार घेतला आहे. आधुनिकेतचा वापर करीत निवडणुक आयोगाने मोबाईल ॲपची मदत घेतली आहे. या ॲपमार्फत मतदारांना घरबसल्या मतदार यादीमधील नाव शोधता येणार आहे.

## भाजपमध्ये दोन गट

## स्मिता पाटील यांचा पत्ता कट?

■ वैकुंठ पाटील यांना मिळणार उमेदवारी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

महायुतीतील अंतर्गत वादानंतर आता भाजपमधील अंतर्गत वाददेखील चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. पेणमध्ये भाजपचे दोन गट तयार झाले असून जिल्हा परिषद निवडणूकीत त्याचे पडसाद उमटणार असल्याची चर्चा सध्या जोर धरीत आहे. जिल्हा परिषद सदस्य तथा माजी सभापती स्व. प्रमोद (पिंट्या) पाटील यांच्या पत्नी स्मिता पाटील यांना उमेदवारी देण्याचे आश्वासन देत भाजपमध्ये पक्षप्रवेश करून घेण्यात आला होता. मात्र, निवडणुकीच्या तोंडावरच भाजपमधील समीकरणे बदलली असून दादर जिल्हा परिषद मतदारसंघात जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.

सध्याच्या घडीला स्मिता पाटील यांचा विचार पूर्णपणे बाजूला ठेवत माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यामुळे भाजपच्या अंतर्गत राजकारणात अस्वस्थता वाढली असून आश्वासन देऊन बाजूला सारले गेल्याची भावना कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे.

सध्याच्या घडीला माजी विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणारे धारप आता मोठ्या अडचणीत सापडल्याचे चित्र आहे. ज्यांच्या शब्दावर पक्षप्रवेश झाला, त्याच शब्दाला आज किंमत उरलेली नाही का, असा सवाल कार्यकर्त्यांमधून उपस्थित होत आहे.

दादरमध्ये प्रश्न केवळ उमेदवार कोण, एवढाच उरलेला नाही. खरा प्रश्न असा आहे की, निर्णय स्थानिक पातळीवर घेतले जात आहेत की वरून लादले जात आहेत? जर धारप प्रभावी नेते असतील, तर त्यांनी दिलेले आश्वासन मोडले कसे गेले? आणि जर निर्णय त्यांच्या हातातच नसेल, तर दादरमधील नेतृत्व नेमके कोणाचे, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या साऱ्या घडामोडींमुळे भाजपच्या गोटात अस्वस्थता वाढली असून कार्यकर्ते संभ्रमात आहेत. दादर मतदारसंघात तापलेले हे राजकारण आता केवळ अंतर्गत चर्चांपुरते मर्यादित राहिले नसून, •➤ पान २ वर

## अस्लम कादिरींना ३ कोटींचा दणका

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

मुरूड तालुक्यातील उसडी येथे बेकायदेशीर दगड, खडी, माती उत्खनन होत असल्याची माहिती कृषीवलने प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली. अखेर कृषीवलच्या दणक्याने महसूल विभागाने माफियांविरोधात कारवाई केली. डंपर, पोकलन, जेसीबीसह ७५ ब्रास माती, खडी जप्त करून अस्लम कादिरी याच्याविरोधात मुरूड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईने मुरूडमधील अवैध माती उत्खनन करणाऱ्यांना दणका मिळाला आहे.



कृषीवलच्या दणक्याने महसूल विभागाची कारवाई

मुरूडमधील उसडी येथील गट नं. १६९/१,१७० या जागेमध्ये बेकायदेशीररित्या माती व बूरूम उत्खनन केले जात होते. वारंवार तहसीलदार यांच्याकडे तक्रार करूनही त्यांच्याकडून ठोस कारवाई केली जात नसल्याचा आरोप केला जात होता. ५७ लाख रुपयांचा दंड •➤ पान २ वर

## पनवेल प्रभाग चारमध्ये भाजपाकडून पैसे वाटप

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिका निवडणुकीसाठी पैसे वाटताना ठाकूर इन्फ्रास्ट्रक्चरच्या कर्मचाऱ्याला पकडण्यात आले आहे. या कंपनीचे मालक मा.खा. रामशेठ ठाकूर व त्यांचे पुत्र आ.प्रशांत ठाकूर हे आहेत. खारघर येथील प्रभाग क्रमांक ४ येथे शेकापचे उमेदवार जगदीश घरत आणि महिला आघाडीच्या सहचिटणीस तेजस्विनी घरत यांनी संबंधित व्यक्तीला बुधवारी (दि.१४) सायंकाळी साडेपाच वाजता पैसे वाटताना पकडले. यावेळी माजी आमदार बाळाराम पाटील हे देखील उपस्थित होते. यावेळी



पैसे वाटणाऱ्या व्यक्तीकडे मतदारांचा आणि सोसायटीच्या नावांच्या याद्या देखील सापडल्या आहेत. शेकापच्या आरोपानंतर निवडणूक आयोगाने घटनास्थळी दाखल होत पंचनामा केला.

## 'शिंदे गटाशी युती नकोच'

**सुनील तटकरे यांचे स्पष्ट संकेत**

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये शिवसेना (शिंदे गट) सोबत युती न करण्याचा ठाम निर्णय राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी जाहीर केला आहे. भाजपसोबत मात्र चर्चा अंतिम टप्प्यात असल्याचे सांगून त्यांनी रायगडच्या राजकीय पटावर नवा वाद निर्माण केला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या रायगड जिल्ह्यातील दहा नगरपालिका निवडणुकांमध्ये महायुतीतील घटक पक्षांमधील मतभेद चव्हाट्यावर आले होते. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्यात समन्वय न झाल्याने अनेक ठिकाणी एकमेकांच्या विरोधात थेट रिंगणात उतरले होते. महाड येथे हा वाद हाणामारीपर्यंत गेला, तर खोपोली येथे राजकीय संघर्षातून शिवसेनेच्या कार्यकर्त्याची हत्या झाल्याची गंभीर घटना घडली. या घटनांमुळे जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असताना तटकरे यांची ही भूमिका महायुतीतील फूट अधिक स्पष्ट करते आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांशी बोलताना खासदार तटकरे यांनी, शिंदे गटाशी युती करणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या •➤ पान २ वर

भारतीय शेतकरी कामगार पक्ष
रायगड-अलिबाग

रायगड जिल्हा शेतकरी कामगार पक्षाच्या विस्तारीत
जिल्हा चिटणीस मंडळाची सभा
गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ रोजी सायं. ०५.३० वाजता
स्थळ : मसाला मंत्र, बॅक्वेट हॉल, राजेश रेसिडेन्सी, प्लॉट नं. २६, शॉप नं. ३ ते १०, सेक्टर ३६, प्रतिक गेम्स समोर (एचडीएफसी बँक), नवी मुंबई, कामोठे ४१० २०९ येथे
सरचिटणीस मा. आमदार जयंत पाटील
यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर विस्तारीत जिल्हा चिटणीस मंडळाच्या सभेस जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य, तालुका चिटणीस मंडळाचे पदाधिकारी व सदस्य तसेच प्रमुख कार्यकर्ते यांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.
सुरेश नामदेव खैरे
जिल्हा चिटणीस, रायगड
शेतकरी कामगार पक्ष

ग्राहक हिताय ग्राहक सुखाय
मुंबई ग्राहक पंचायत
आयोजित
मराठा समाज भवन
पेण खोपोली बायपास रोड, छत्रपती संभाजी चौक, गणपती वाडी, पेण, जिल्हा रायगड
पेण येथे प्रथमच



ग्राहक पंचायत पेठ
दिनांक-
१४ जानेवारी ते १८ जानेवारी २०२६
वेळ- सकाळी ११.००ते रात्रौ ८.३०
फसव्या जाहिरातींना भुलू नका! आपल्या ग्राहक पंचायत पेठेला भेट द्यायला विसरू नका.



# कर्जत तालुक्यात रंगणार तिरंगी लढत

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत विधानसभा मतदारसंघात कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे सहा जिल्हा परिषद गट आहेत. तर, कर्जत पंचायत समितीचे १२ गण असून मार्च २०२३ पासून लांबलेली सार्वत्रिक निवडणूक ५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. त्यामुळे कर्जत तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून या निवडणुकीसाठी तिरंगी लढत कर्जत तालुक्यात होऊ शकते, असे राजकीय चित्र निर्माण झाले आहे.

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेचे सहा गट असून त्यात कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव आणि मोठे वेणगाव या नाव बदलून तयार केलेल्या नवीन गटासाठी निवडणूक होत आहे. तालुक्यातील कळंब जिल्हा परिषद गट अनुसूचित जमाती राखीव असून कशेळे गट हा अनुसूचित जमाती महिला राखीव आहे. माणगाव तर्फे वरेडी गट नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव असून नेरळ जिल्हा परिषद गट सर्वसाधारण महिला राखीव आहे. कडाव जिल्हा परिषद गट नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव असून मोठे वेणगाव हा गट अनुसूचित जमाती राखीव आहे. कर्जत पंचायत समिती पोशीर गणामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव, कळंब गणामध्ये अनुसूचित जमाती महिला राखीव तर कशेळे गणामध्ये अनुसूचित जमाती, पाथरज गणामध्ये अनुसूचित जमाती महिला राखीव माणगाव तर्फे वरेडी गणामध्ये सर्वसाधारण, उकरूल गणामध्ये नागरिकांचा मागास प्रवेश मागील राखीव, नेरळ गणामध्ये सर्वसाधारण, दामत गणामध्ये सर्वसाधारण, कडाव गणामध्ये सर्वसाधारण महिला राखीव, वाकस गणामध्ये सर्वसाधारण, मोठे वेणगाव गणामध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि बीड गणामध्ये सर्वसाधारण महिला असे आरक्षण आहे.

सध्याची कर्जत तालुक्याची राजकीय स्थिती लक्षात घेता तीन वर्षांनी होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी मोठी राजकीय चुरस निर्माण झाली आहे. त्यात शिवसेना शिंदे गटाने स्वबळाचा नारा दिला असल्याने निवडणुकीतील चुरस वाढली आहे. तयेच, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना ठाकरे गट यांची आघाडी झाली आहे. तर, भारतीय जनता पक्ष यांच्याकडून स्वबळाची चाचपणी केली जात आहे. दरम्यान, शेतकरी कामगार पक्ष, राष्ट्रवादी शरद पवार गट, राष्ट्रीय काँग्रेस व कम्युनिस्ट पक्ष हे इंडिया आघाडीचे घटक पक्ष या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना ठाकरे गट यांच्या कर्जत परिवर्तन आघाडी मध्ये सहभागी होणार का? हे पाहावे लागणार आहे. कर्जत तालुक्यातील राजकीय गुट्टा आघाड्या यांचे चित्र पुढील आठवड्यात स्पष्ट होण्याची शक्यता आहे. त्यावेळी कर्जत तालुक्याचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे. मात्र, कर्जत तालुक्या तिरंगी लढत नक्कीच होणार असल्याची चर्चा आहे.

# निवडणुक कामाच्या ताणामुळे शिक्षिका त्रस्त

। पनवेल । प्रतिनिधी ।

महापालिका व निवडणूक यंत्रणेकडून देण्यात येणाऱ्या निवडणूक कामांमुळे महिला कर्मचारी अक्षरशः त्रस्त झाल्या आहेत. त्यांचा वाढता ताण सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. १५ तारखेला होणाऱ्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महापालिका कर्मचारी, महिला शिक्षिका तसेच खासगी शिक्षण संस्थांतील महिला कर्मचाऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर निवडणूक कामात समावेश करण्यात आला आहे. मात्र, सकाळपासून रात्री उशिरापर्यंत सुरू असलेली कामे, सतत बदलणाऱ्या जबाबदाऱ्या आणि अपुरी विश्रांती यामुळे महिला कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

निवडणुकीच्या तयारीसाठी प्रशिक्षण, मतदार यादी तपासणी, मतदान केंद्र व्यवस्थापन, साहित्य वाटप आदी विविध जबाबदाऱ्या महिलांवर सोपविण्यात आल्या आहेत. मात्र, अनेक ठिकाणी प्रवासाची गैरसोय, सुरक्षिततेचा अभाव, वेळेचे कोणतेही ठोस नियोजन नसणे यामुळे महिला कर्मचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. विशेषतः विवाहित महिला कर्मचाऱ्यांना घरगुती जबाबदाऱ्या, लहान मुलांची काळजी आणि त्यातच निवडणूक कामाचा वाढता भार यांचा ताळमेळ साधताना मानसिक व शारीरिक थकवा सहन करावा लागत आहे. महिला कर्मचारी व शिक्षिकांनी प्रशासनाकडे कामाचे वेळापत्रक नियोजनबद्ध ठेवावे, सुरक्षित वाहतूक व विश्रांतीची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे.

## शेकापचे जनार्दन गावंड यांचे निधन

। पेण । प्रतिनिधी ।



खारपाले गावचे मा.मंत्री मोहनराव पाटील यांचे खंदे समर्थक जनार्दन गावंड यांचे नुकतेच निधन झाले. कासू विभागात सहकार राबवण्यामागे जनार्दन गावंड यांचे मोलाचे सहकार्य शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांना लाभले. त्यांनी विविध कार्यकारी सहकारी खारपाले संस्थेचे चेअरमन तसेच विविध कार्यकारी सहकारी गडब संस्थेचे व्हाईस चेअरमन म्हणून काम केले. त्यांच्या पश्चात मुलगा माणिकराज हे त्यांच्या समाजसेवेचा वारसा पुढे चालवत आहेत. त्यांच्यावर खारपाले येथील स्मशानभुमीत अत्यसंस्कार झाले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पोलिसांना बालविवाह रोखण्यात यश

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुका पोलिसांच्या तत्परतेमुळे बालविवाह रोखण्यास यश आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील फणसवाडी या गावात वाघमारे कुटुंबियांत बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती तालुका पोलिसांना मिळाली होती. ही माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरिक्षक गजानन घाडगे यांच्या आदेशान्वये सहाय्यक पोलीस निरिक्षक कुदळे, पोलीस उपनिरीक्षक फड व प्रदीप पाटील यांनी त्या ठिकाणी जाऊन बैठक घेतली. यावेळी ग्रामपंचायत अधिकारी सदाशिव लवते, पोलीस पाटील प्रविण पाटील, सरपंच संजय घरत, आशा सेविका यांच्यासह वाघमारे कुटुंबियांना व गावातील स्त्री-पुरुषांना या बैठकीला बोलावले होते. या सर्वांची बैठक घेऊन त्यांना बालविवाहबाबत माहिती देण्यात आली. तसेच, त्यांचे बालविवाह रोखण्याबाबत समुपदेशन करण्यात आले.

## नेत्रालयाच्यावतीने मोफत चष्मे वाटप



। रेवदंडा । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील नागांव-खारगल्ली येथे श्री साई नेत्रालयाच्यावतीने २३ डिसेंबर रोजी मोफत नेत्र तपासणी शिबीर व चष्मा वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम येथील प्रशांती निवास येथे श्री साईसेवक सुरेश मेहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

या कार्यक्रमाला नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर, माजी सरपंच नंदुशेठ मयेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच, यावेळी श्री साई सेवक सुरेश मेहेर यांच्यासह शिवराम पटेल व नरेश पटेल हे देखील उपस्थित होते. यावेळी श्री साई नेत्रालयाच्यावतीने रूग्णांची नेत्र तपासणी करून गरजूंना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. यावेळी एकूण ३४ लाभार्थींना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. शिवाय २० गरजूंची नेत्र ऑपरेशन लायन्स क्लब चोंढी यांचे सहकार्याने करण्यात आले. नागाव-खारगल्ली येथील प्रशांती निवास येथे श्री साई नेत्रालयाच्यावतीने ओ.पि.डी. युनिटद्वारे प्रत्येक महिन्याचा २३ तारखेला नेत्र तपासणी संबधीत सर्व उपचार, तसेच मोती बिंदू/काच बिंदूचे मोफत ऑपरेशन करण्यात येते. त्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड झेरॉक्स प्रत आवश्यक आहे, अशी माहिती सत्यसाई सेवक सुरेश मेहरे यांनी दिली.

## रस्ते झाले चकाचक

**माथेरान :** येथील मुख्य रस्त्यावर काही प्रमाणात घोड्यांच्या लीदमिश्रित धुळीचे साम्राज्य पसरले आहे. त्याचा परिणाम पर्यटनावर होऊ नये यासाठी गावात स्वच्छता राखल्याशिवाय पर्याय नाही. ही बाब ओळखून नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी नगरपरिषद व घनकचरा व्यवस्थापनाच्या कर्मचारी वर्गाला सूचना करून मुख्य मार्गावरील रस्त्यांची स्वच्छता मोहीम राबविली. त्यामुळे सध्यातरी हे रस्ते चकाचक दिसत असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E–TENDER NOTICE (THIRD CALL)**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No:- EE/EHV (O &M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-22/IIIrd Call/2025-26 Dtd.15.01.2026 RFX No. 7000038598** | **Sub:-** Third Call for SRM E- Tender for supply of various size of clamp, Connector & Hardware at 220 kV Mahad Substation and EHV Line Maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Division Mahad for the year 2025-2026. | **Rs. 6,98,972/- (Excluding GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from **15.01.2026 @ 00:00 hrs to 24.01.2026 @23:59 Hrs** for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in.**
**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.8793505100
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn, Mahad**

### जाहीर नोटीस

याद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे लाडीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील सविस्तरपणे नमूद केलेली जमिन मिळकत आमचे अशिल सौ. सुलभा गजानन खडे यांनी सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अशोक शंकर दगडे, सौ. भारती भानुदास पालकर, श्रीम. मालती मधुकर भोईर व श्री. विजय शांताराम तवळे यांचे कडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|
| २ | ३ | ०.३९.०० पो.ख.०.०३.०० एकूण ०.४२.०० | ७.४४ |

वरील वर्णन केलेल्या जमिन मिळकतीचे बाबतीत कोणाचाही दान, गहाण, फरोक्त, अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, कायदेशीर हितसंबंध, करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या कायदेशीर लेखी पुराव्यासह खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे.

वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असल्याचे समजून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १५/०१/२०२६.

सही/-
**ॲड. पूजा गणेश म्हसे**
ऑफीस नं. ४, रिजेन्सी प्लाझा, निर्माण नगरी, नेरळ
(पू.) ता. कर्जत, जि. रायगड मो. ८०८७४३०४४७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-सालवड, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेत जमिन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. नरेश कुमार झा | ६० | १ | १-९६-३० पैकी १-३०-८६ | १२-३४ |
| श्री. नरेश कुमार झा | ६० | २ | ०-३७-९० | ४-१९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे
कार्यालयीन पत्ता :- ए विंग,फ्लॅट नं.४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत जि.रायगड, ४१०२०१

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :१५-०१-२०२६
मो.नं.९०२८९८२२७७
ई मेल- adv.jayeshmhase@gmail.com

## Dr. N .Y. Tasgaonkar Institute of Medical Science

Sau. Vandana Tasgaonkar Health Care Complex, Kalyan Karjat Road, Opp. Bhivpuri Road Railway Station, Post-Koshane, Tal-Karjat, Dist-Raigad, MH-410 201,
Mail ID -dean.rhrc@tasgaonkartech.com Webside-www.nytims.in
Ph- 9529089935/ 8806753541/ 8983621211 Fax No. 02224318823
(Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik)

### WANTED

A) Applications are invited for filling up the following posts in the above said College/ Institute

| Sr. No. | Type of Post | Vacant Post |
|---|---|---|
| 1 | DEAN/PRINCIPAL | OPEN-1 |

| Sr. No. | Subject | Professor | Reader | Lecturer | Tutor |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ANATOMY | | OPEN-1 | OPEN-2 | |
| 2 | PHYSIOLOGY | OPEN-1 | OPEN-1 | OPEN-1 | |
| 3 | BIO-CHEMISTRY | OPEN-1 | OPEN-1 | OPEN-2 | |
| 4 | PHARMACOLOGY | OPEN-1 | OPEN-1 | OPEN-1 | |
| 5 | PATHOLOGY | VJA-1 | | ST-1, OBC-1 | |
| | BLOOD BANK | | | | |
| 6 | MICROBIOLOGY | | OPEN-1 | OPEN-1 | |
| 7 | FORENSIC MEDICINE | OBC-1 | SC-1 | OBC-1 | |
| 8 | Community/ Medicine/ Preventive & Social Medicine | | EWS-1 | ST-1, OPEN-1 | |
| | Epidemiologist-Cum-Asst. Prof. | | | | |
| | Statistician –cum-Tutor | | | | OPEN-1 |
| | RHTC-MO cum Lecturer/ Asst. Prof. | | | | |
| | UHTC-MO cum Lecturer/ Asst. | | | | |
| 9 | GENERAL MEDICINE | SC-1 | SC-1, OPEN-1 | EWS-1 | |
| 10 | PAEDIATRICS | OPEN-1 | OPEN-1 | OPEN-1 | |
| 11 | T.B. & RESPIRATORY DISEASES | | | | |
| 12 | V.D. & LEPROSY | | OBC-1 | VJA-1 | |
| 13 | PSYCHIATRY | | EWS-1 | | |
| 14 | GENERAL SURGERY | EWS-1 | OBC-1 | OBC-1 | |
| 15 | ORTHOPAEDICS | OPEN-1 | ST-1 | OPEN-1 | |
| 16 | OPTHALMOLOGY | | | OPEN-1 | |
| 17 | OTO-RHINO-LARYNGOLOGY (ENT) | NTB-1 | OBC-1 | OPEN-1 | |
| 18 | ANAESTHESIOLOGY | OBC-1 | NTD-1 | SBC-1, OBC-1 | |
| 19 | RADIO-DIAGNOSIS | | EWS-1 | OPEN-1 | |
| 20 | DENTISTRY | | | OPEN-1 | |

B) **Qualification & Experience :**

| Post(s) | Qualification & Experience |
|---|---|
| Professor | a) Recognized post graduate degree medical qualification in the concerned subject. b) As Associate Professor in the subject concerned for three years in recognized medical college. c) Four Research papers accepted/published in index/national journal as first/second author on cumulative basis. Out of these four research publications minimum two research publication must be published during the tenure of the Associate Professor. |
| Associate Professor/ Reader | a) Recognized post graduate degree medical qualification in the concerned subject. b) As Assistant Professor in the subject concerned for four years in recognized medical college. c) Two Research papers accepted/published in index/national journal as first/second author during the tenure of Assistant Professor. |
| Assistant Professor/ Lecturer | a) Recognized Post graduate degree in the concerned subject. b) Three years teaching experience in the subject in a recognized Medical College as Resident / Registrar / Demonstrator / Tutor |
| Tutor / Demonst. | a) M.B.B.S. qualification or M. Sc. (Medical Anatomy) in particular subject as specified by M.C.I. candidate possessing post graduate qualification in subject will be preferred. |

**C) General Notes:-**

1) Horizontal Reservation for Ladies / Sports etc. as per the state government circular / regulations and the differently abled persons reservation as per the government regulations / circular issued from time to time (Ref: Government letter GAD/1118/CR417/16 dated 28/12/2018, for differently abled persons GR dated 27/04/2011, 04/08/2011, 28/07/2014, 29/05/2019 and MEDD letter dated 30/06/2015)(if applicable).

The vertical reservation allotments vide Government Resolution and circular dated 29/05/2017, 25/07/2018, 05/12/2018, 19/12/2018, 07/01/2019, 12/02/2019, 16/02/2019, 18/02/2019, 04/07/2019, 05/03/2020, 11/03/2020 etc. (if applicable).
2) Candidates applying for reserve category post(s) should submit caste certificate & caste validity certificate and also recent non-creamy layer certificate, wherever applicable.
3) The benefits of reservation shall be admissible to the backward class / category candidates who are domiciled in the state of Maharashtra only (if applicable).
4) Age Limit & Educational Qualifications shall be considered up to last date of the application & experience shall be considered up to earlier day of the interview.
5) The decision taken by MUHS authorities regarding essential qualifications and experience shall be applicable, from time to time.
6) Qualified teachers above the age of 64 years will be considered for appointment of one – one year, as per respective Council's norms.
7) Pay Scale is as per rules.
8) Application along with attested copies of all relevant certificates must reach to the College on or before: 28/01/2026

**D) Other Notes : (College Level)**
Apply to the **Dean,** at **Dr. NY Tasgaonkar Institute of Medical Science At Diksal, Post-Koshane, Tal-Karjat, Dist-Raigad 410 201** on plain paper / prescribed format along with attested copies of certificates and experience certificates.

**Sd/-
Dean
(Signature & College Seal)**

पान १ वरून

## निवडणूकीसाठी ८५०० यंत्र

व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांच्या मदतीने प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे. या निवडणूकीसाठी १६ ते २१ जानेवारी या कालावधीत उमेदवारी अर्ज स्विकारले जाणार आहेत. तसेच, पारंपारिक पद्धतीने ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यावेळी जिल्ह्यामध्ये १७ लाख ३८१ मतदार ५ फेब्रुवारीला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. हे मतदान सकाळी ७:३० ते सायंकाळी ५:३० यावेळेत २,३२३ केंद्रामध्ये होणार आहे. यावेळी सर्वात जास्त पनवेलमध्ये तर सर्वात कमी तळामध्ये मतदार आहेत. मतदान प्रकीया शांततेत व सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन यंत्रणा सज्ज झाली आहे. यावेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र साडेआठ हजारहून अधिक आहेत. त्याची व्यवस्थादेखील करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी जावळे यांनी दिली आहे.

**मतदार संख्येवर दृष्टीक्षेप**

तालुके - जि.प. गट - पं.स. गण - मतदार - केंद्र
पनवेल - ८ - १६ - २,७९,७७६ - ३४६
कर्जत - ६ - १२- १,७०,७०२ - २२०
खालापूर- ४ - ८ - १,१०,९८२ - १४४
सुधागड- २ - ४ - ५३,९९८ - ७५
पेण - ५ - १० - १,३९,४७९ - १९०
उरण - ४ - ८ - १,०८,५२० - १३५
अलिबाग - ७ - १४ - २,०१,९२३ - २६१
मुरुड - २ - ४ - ५५,५५२ - ८१
रोहा - ४ - ८ - १,२८,७६३ - १९४
तळा - २ - ४ - ३२,१२२ - ५२
माणगाव - ४ - ८ - १,३९,५१९ - २०६
म्हसळा - २ - ४ - ४३,५३१ - ६९
श्रीवर्धन - २ - ४ - ५६,८२६ - ८०
महाड - ५ - १० - १,३९४४६ - २०३
पोलादपुर - २ - ४ - ३९,२४२ - ६७
एकूण - ५९ - ११८ - १७,००,३८१ - २३२३

## अस्लम कादिरींना ३ कोटींचा दणका

आकारूनही उत्खनन सूरू होते. आमदारांच्या कृपेने हा गोरखधंदा सुरु होता. उसडी येथील माती, खडी, बूरूम उत्खननाविरोधात कृषीवलने आवाज उठविला. अखेर कृषीवलच्या दणक्याने महसूल प्रशासन खडबडून जागे झाले. तहसीलदार आदेश डफल यांनी गटविकास अधिकारी यांना कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार गटविकास अधिकारी यांनी पोलिसांच्या मदतीने रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उसडी येथे उत्खननाच्या ठिकाणी छापा टाकला. या छाप्यात पाच डंपर, पोकलन, जेसीबी व ७५ ब्रासहून अधिक माती, खडी, बुरूमचा साठा असा एकूण ३ कोटीहून अधिक मुद्देमाल जप्त करून अस्लम कादिरी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मूरूडमध्ये राजरोसपणे सुरु असलेल्या अवैध धंद्याविरोधात कारवाई करण्यास महसूल विभाग टाळाटाळ करीत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला होता. अखेर महसूल विभागाने कारवाई केल्याने स्थानिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मुरूड तालुका पर्यटनाच्यादृष्टीने महत्वाचा ठरत असताना याठिकाणी धनदांडग्यांमार्फत बंगले बांधले जात आहेत. काशीद, मुरूड परिसरात वेगवेगळ्या कारणावरून बांधकाम केले जात आहे. तसेच माती, बूरूमचे उत्खनन करून शासनाच्या जमीनीवर अतिक्रमण केले जात आहे. डोंगर पोखरले जात आहे. सीआरझेडचे उल्लंघन करून बांधकाम केल्यास गुन्हा दाखल करण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी यांना जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. मात्र काशीदमधील सीआरझेडचे उल्लंघन करून होत असलेल्या बांधकामाविरोधात गुन्हे दाखल करण्यास उपविभागीय अधिकारी टाळाटाळ का करतात, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## स्मिता पाटील यांचा पत्ता कट?

धारप या पेचातून कसे बाहेर पडतात आणि भाजप नेमका कोणता निर्णय घेतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. या अचानक बदललेल्या राजकीय वाऱ्यामुळे धारप यांची मोठी गोची झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. एकीकडे आश्वासनाचा मुद्दा, तर दुसरीकडे जुन्या नेत्यांचे वर्चस्व या संघर्षात नेमका भाजपचा निर्णय काय असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## शिंदे गटाशी युती नकोच

निवडणुकांसाठी भाजपसोबत चर्चा सुरू असून ती सकारात्मक दिशेने होत असल्याचे सांगितले. त्यामुळे रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ जागांसाठी ५ फेब्रुवारीला होणाऱ्या मतदानात राष्ट्रवादी-भाजपची जोडी विरुद्ध शिंदे गटाचा थेट लढा अपेक्षित आहे. या युतीबाबतच्या तटकरे यांच्या स्पष्ट वक्तव्याने जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली असून, आगामी दिवसांत आणखी घडामोडी घडण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत ग्रामीण विकास, पायाभूत सुविधा आणि स्थानिक समस्या केंद्रस्थानी असतील. तटकरे यांच्या भूमिकेमुळे रायगडच्या राजकारणात नवा ट्विस्ट आल्याने सर्वच डोळे निवडणुकीवर खिळले आहेत.

# निर्भयतेने मतदान करा

## प्रशासनाचे आवाहन ; ग्रीन, पिंक, आदर्श बुथसह पनवेल पालिकेची यंत्रणा सज्ज



| पनवेल | प्रतिनिधी |

**पनवेल महानगरपालिका निवडणुक २०२५-२६च्या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा मुख्य निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली १५ जानेवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीची सज्जता नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली आहे. मतदानास सर्व पात्र मतदारांनी येऊन निर्भयतेने मतदान करावे, ग्रीन, पिंक, आणि आदर्श मतदान केंद्रासह महानगरपालिकेची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. मतदानास नक्की या आपले स्वागत आहे**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील २० प्रभागांमध्ये २४६ उमेदवारांसाठी ही निवडणूक बहुसदस्यीय पॅनल पद्धतीने होत असून, प्रभाग क्रमांक ११ व २० व मध्ये अ, ब, क अशा ३ जागांसाठी, तर इतर प्रभागांमध्ये अ, ब, क,ड अशा ४ जागांसाठी नागरिकांना मतदान करावयाचे आहे. निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यातील कामकाजाचा आयुक्तांमार्फत नियमितपणे आढावा घेतला असून प्रत्यक्ष पाहणीही करण्यात आलेली आहे. पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका भयमुक्त, निष्पक्ष व शांततेत होण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने कार्यरत रहावे अशा सूचना मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) व निवडणूक निरीक्षक मनिषा कुंभार यांच्यामार्फतही निवडणूकविषयक कार्यवाहीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण ५,५४,५७८ मतदार असून त्यामध्ये २,९४,८२१ पुरुष, २,५९,६८५ महिला मतदारांचा समावेश आहे. निवडणुकीसाठी ६ विभागांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांची कार्यालये स्थापन करण्यात आली असून त्या ठिकाणाहून निवडणूक साहित्याचे वितरण व संकलन केले जाणार आहे. निवडणुकीकरिता एकूण ६५६ मतदान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. दिनांक १५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.३० ते ५.३० दरम्यान मतदान होणार आहे. सर्व मतदान केंद्रांवर आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात येत असून मतदारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये याची दक्षता घेण्यात आली आहे. त्यासाठी दिव्यांग व वृद्ध नागरिकांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली असून मदतीसाठी स्वयंसेवकही कार्यरत असणार आहेत. मतदान केंद्रांवरील कामकाजासाठी मतदान केंद्राध्यक्ष, ३ मतदान अधिकारी व शिपाई अशा एकूण ४,१२५ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांची दोन प्रशिक्षणे पूर्ण झाली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर पोलीस बंदोबस्तही तैनात असणार आहे. निवडणुकीसाठी ८९७ अधिक कंट्रोल युनिट व १,९१२ बॅलेट युनिट प्राप्त झाली असून सर्व मतदान यंत्रांची प्रथम स्तर तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.प्रथम स्तर तपासणीनंतर मतदान यंत्रांचे मतदान केंद्र संख्यानिहाय वितरण करून मतपत्रिका मांडणी (बॅलेट सेटिंग) व सीलबंद (सीलिंग) प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. सर्व मतदान यंत्रे संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांतील ६ स्ट्राँग रूममध्ये कडक पोलीस बंदोबस्तात ठेवण्यात आली आहेत.सर्व मतदान केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. प्रत्येक विभागामध्ये एक महिला विशेष ङ्गसखी मतदान केंद्र (पिंक बूथ) तसेच पर्यावरणपूरक आदर्श मतदान केंद्र (ग्रीन बूथ) उभारण्यात येत आहे. यामध्ये पिंक मतदान केंद्र कारमेल कॉन्वेंट स्कूल (कळंबोली), ग्रीन मतदान केंद्र सेंट जोसेफ स्कूल(नवीन पनवेल), बाल भारती पब्लिक स्कूल येथे आदर्श मतदान केंद्र (खारघर) उभारण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

निवडणुकीच्या कामकाजासाठी ६९ क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून ते आपल्या कार्यक्षेत्रातील मतदान केंद्रांवरील कामकाजावर लक्ष ठेवणार आहेत. मतदान यंत्रांसाठी प्रशिक्षित मास्टर ट्रेनरही कार्यरत असणार आहेत. पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी सज्ज ठेवण्यात आले आहेत. मतदान साहित्य वितरण व संकलनासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग नेमण्यात आला असून मतमोजणीसाठी आवश्यक कर्मचाऱ्यांची आठही विभागांमध्ये नेमणूक करून त्यांचे प्रशिक्षणही पूर्ण करण्यात आले आहे.संपुर्ण निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक वाहन व्यवस्थेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. सहा ठिकाणी दिनांक १६ जानेवारी रोजी १० वाजल्यापासून सहा मतमोजणी केंद्रावरती मतमोजणी होणार आहे.

मतमोजणी करिता संबंधित निवडणूक निर्णय कार्यालयानिहाय मतमोजणी केंद्र स्थापना करण्यात आलेली आहेत.यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी क्र. १ कळंबोली नवीन वॉर्ड कार्यालय, विजयदुर्ग, निवडणूक निर्णय अधिकारी क्र. २ खारघर नवीन वॉर्ड कार्यालय, सिंधुदुर्ग, खारघर, निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ३ कळंबोली प्रभाग समिती ब कार्यालय, पनवेल महानगरपालिका कळंबोली, निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ४ कामोठे नवीन वॉर्ड कार्यालय, सुवर्णदुर्ग, कामोठे, निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ५ कळसेकर टेक्निकल कॅम्पस, न्यू पनवेल, निवडणूक निर्णय अधिकारी क्र. ६ इंदुबाई ए. वाजेकर इंग्लिश मीडियम स्कूल, पनवेल या मतमोजणी केंद्रांचा समावेश करण्यात आला आहे.

## निवडक



### गडब ते शिर्डी पायी दिंडी रवाना!

**हमरापूर :** पेण तालुक्यातील गडब- चिर्बी येथील ओम साईराम सेवा मंडळ तर्फे गडब ते शिर्डी अशी पायी पदयात्रा दिंडी निघाली आहे. गडब गावातील चिर्बी पाड्यातील ओम साईराम सेवा मंडळाची सेवकांची ही सर्वात जुनी दिंडी असून यंदाचे हे मंडळाचे २४ वा वे वर्ष आहे. गडब येथे आरती करून सकाळी मुंबई-गोवा महामार्गावर निघालेल्या या दिंडीत पदयात्री, महिला तरुण वर्ग मोठ्या संख्येने सामील झाले होते. पेण शहरात आल्यावर शहरातील साई मंदिरात आरती करून तेथे महाप्रसाद घेतल्यानंतर ही पायी पदयात्रा दिंडी शिर्डीकडे मार्गस्थ झाली. पेण- खोपोली मार्गे कामशेत, चाकण, खेड, नारायणगाव मंचर, मार्गे ही दिंडी सोमवारी (दि.१९) शिर्डीत पोहोचणार असून तेथे श्री साईबाबांचे दर्शन घेतल्यानंतर दि. २१ जानेवारी रोजी गडब येथे येईल अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष कमलाकर पाटील व विजय पाटील यांनी दिली. तर शुक्रवारी (दि. २३) गडब-चिर्बी येथे भंडारा होणार असून यानिमित्त भजनाचे कार्यक्रम होणार आहेत.

### मृताच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**रायगड :** अलिबाग तालुक्यातील तळवली येथील पुलाखाली नदीच्या पाण्यात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह बुधवारी (दि.३१) सकाळी सापडला. याप्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. परंतु मृताची अद्याप ओळख पटली नाही. त्यामुळे मृताच्या नातेवाईकांचा शोध घेण्यास सुरुवात केली असल्याची माहिती अलिबाग पोलिसांकडून देण्यात आली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अलिबाग-पेण मार्गावरील तळवली येथील पुलाच्या खाली नदीमध्ये एक व्यक्ती बुधवारी (दि.३१) सकाळी बेशुध्द अवस्थेत पाण्यामध्ये तरंगता दिसून आला होता. या घटनेची माहिती मिळताच अलिबाग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या मदतीने त्या व्यक्तीला बाहेर काढण्यात आले. अलिबागमधील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरु असताना सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास तो मयत झाल्याचे सांगण्यात आले. याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अद्याप अनोळखी व्यक्ती ओळख पटली नाही. मृत व्यक्तीचे अंदाजे वय ४० वर्षे आहे. अंगाने सडपातळ, रंग सावळा, केस काळे, उजव्या हाताच्या दंडावर सूर्य, मनगटावर ओम गोंदलेले असे वर्णन आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक आर. जे. दाभाडे हे अधिक तपास करीत असल्याची माहिती प्रसिध्दी पत्रकामार्फत देण्यात आली.

### 'क्रॉस वोटिंग'ची उमेदवारांना भीती

**पनवेल :** महापालिका निवडणुकीत पॅनेल म्हणून प्रचार होत असला तरी अनेक प्रभागांमध्ये क्रॉस वोटिंगची धास्ती उमेदवारांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे विरोधी पॅनेलवर लक्ष ठेवतानाच स्वतःच्या पॅनेलमधील उमेदवार एकमेकांवर मवॉचफ ठेवत असल्याचे चित्र पनवेलमध्ये दिसून येत आहे. क्रॉस वोटिंग झाल्यास संपूर्ण पॅनेल निवडून आणण्याचे स्वप्न अनेक ठिकाणी धुळीस मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येत्या १५ जानेवारीला पनवेल महापालिका निवडणुकीसाठी मतदान होत आहे. दुसऱ्या दिवशी मतमोजणी होणार आहे. महापालिका निवडणुकीसाठी एकूण २५४ उमेदवार रिंगणात आहेत. विशेष म्हणजे महापालिकेत सत्ता येण्यासाठी ४० नगरसेवकांचे बहुमत लागणार असून भाजपने आधीच ६ व एक भाजप प्रणित एक अपक्ष अशा सात जागांवर बिनविरोध निवडून येऊन बाजी मारली आहे. या निवडणुकीत ४१ माजी नगरसेवक थेट रिंगणात उतरले असून, उर्वरित पाच जागांवर माजी नगरसेवकांनी आपल्या मुलगा, पत्नी किंवा पतीस उमेदवारी मिळवून दिली आहे. शेकाप महाविकास आघाडीने सात माजी नगरसेवकांना संधी दिली आहे, तर भाजप महायुतीने तब्बल ३४ जागांवर माजी नगरसेवकांना उमेदवारी दिली आहे. यामुळे अनुभवाच्या जोरावर निवडणूक जिंकण्याची रणनीतीचा प्रभागांत अंतर्गत नाराजी उफाळून आली प्रयत्न स्पष्टपणे दिसतो. दरम्यान, काही आहे. त्यामुळे क्रॉस वोटिंगची किड महाविकास आघाडीमध्ये लागण्याची शक्यता आहे.

## पोलीस दलातील मॅक्सचे निधन

### पंतप्रधानांसह राष्ट्रपतींच्या सुरक्षेसाठी राहिले मोलाचे योगदान



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

राष्ट्रपती, पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री यांच्या सुरक्षेसाठी मोलाचे योगदान देणाऱ्या मॅक्सचे मंगळवारी (दि.१३) सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. रायगड पोलीस दलातील श्वान पथकात कार्यरत असणाऱ्या मॅक्सचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

मॅक्सचा जन्म १० मार्च २०१७ मध्ये झाला होता. रायगड पोलीस दलात १७ मार्च २०१८ मध्ये रुजू झाला. रायगड पोलीस दलातील श्वान पथकामध्ये आठ वर्ष दहा महिने तीन दिवस सेवा केली. लॅब्रोडरी जातीमधील असलेल्या मॅक्सने मध्य प्रदेश येथील ग्वालिअरमधील टेकनपूरच्या राष्ट्रीय श्वान प्रशिक्षण केंद्र येथे प्रशिक्षण पूर्ण केले. स्फोटक पदार्थ शोधणे असे त्याचे कामाचे स्वरूप होते. ४३६ व्हीव्हीआयपी कॉल, व ४०० व्हीआयपी बंदोबस्त मॅक्सच्या माध्यमातून झाले आहेत. पेण बस स्थानकातील थ्रेड कॉल, माणगाव, रोहा, खालापूर येथील गावठी बॉम्ब शोध, श्रीवर्धन, अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील स्मोकर सेल, रेवदंडा येथील बोयावरील जीपीएस शोधण्यासाठी मॅक्सचे मोलाचे योगदान राहिले आहे.

## राजमाता जिजाऊ जयंती साजरी

| तळे | प्रतिनिधी |

जी. एम.वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे उपस्थित होते. मंचकावर महाविद्यालयाचे आई. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. विवेक राणे, एन. एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. एन. एम.शेख. तसेच प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले. शेवटी अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. एन एम शेख यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. अमोल निकम यांनी केले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नंदकुमार वेदक, संस्थेचे सचिव उन्मेश वेदक तसेच महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य पुरुषोत्तम मुळे आणि डॉ. नानासाहेब यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## गुलाबी साडीवर नयना आपटे थिरकल्या



| आगरदांडा | प्रतिनिधी |

गुलाबी साडी आणि गाली लाले
लाल... दिसते कशी मी
फोटो माझा काढ..

अल्बममधील हे लोकप्रिय गाणे लेखक दिग्दर्शक प्रविण भारदे यांनी आपल्या मोबाईलवर लावले आणि घरोघरी मातीच्या चुली या स्टार प्रवाहवर सुरू असलेल्या आजीच्या भूमिकेतील प्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे नांदगावच्या छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी धरलेल्या ठेक्यावर त्यांच्या समवेत या गाण्यावर थोडावेळ का म्हणाना पण मोठ्या आनंदाने थिरकल्या.

मुंबईमध्ये गेली सत्तावीस वर्षे कार्यरत माता अनुसया प्रॉडक्शन्स या संस्थेच्या कॉमेडी चेटकीण व मला आईबाबा हवेत या दोन नाटिका एकाच तिकिटात बघण्याची संधी मुरुड तालुक्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांना नाटकांचे लेखक दिग्दर्शक प्रविण भारदे यांनी उपलब्ध करून दिली आहे. सदर प्रयोगासाठी ज्येष्ठ अभिनेत्री नयना आपटे नांदगावहून मुरुडकडे जात असताना वाटेतील नांदगाव हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना पाहताच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना भेटण्याची व त्यांना अभिनय कसा करावा याबाबत माहिती देण्याच्या तीव्र इच्छाशक्तीने शाळेत खेचून आणले. आणि त्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये अक्षरशः हरखून गेल्या भारदे यांना त्यांनी गुलाबी साडी... चे गाणे आपल्या मोबाईलवर लावण्यास सांगितले आणि विद्यार्थ्यांबरोबर त्या चांगल्याच थिरकल्या.

## कर्जतमध्ये शिंदे गटाने भाजपला फसवले

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यात शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले जात नाही.त्याचवेळी नगरपरिषद निवडणुकीत भाजपला शिंदे गटाची साथ मिळाली नाही आणि फसवले गेले असा आरोप भाजप कर्जत विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांनी केला.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुका भारतीय जनता पक्षाची कार्यकर्ता बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना कर्जत विधानसभा

### ■ कार्यकर्ता सभेत किरण ठाकरे यांचा घणाघात

निवडणूक प्रमुख किरण ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी, संघटनात्मक मजबुती, तसेच युतीबाबत कार्यकर्त्यांच्या भावना खुलेपणाने मांडण्यात आल्या. बैठकीत मार्गदर्शन करताना किरण ठाकरे यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या स्थानिक जनतेच्या विकासाचा कणा आहेत. युती कोणाबरोबर होईल किंवा होणार नाही, याबाबत सध्या चर्चा सुरू आहेत; मात्र भाजपने कोणत्याही परिस्थितीत सर्व जागांवर उमेदवार उभे करण्याची तयारी ठेवली पाहिजे. परिवर्तन घडवायचे असेल तर ङ्गएकला चलो रेफ या भूमिकेतून काम करण्याची तयारी ठेवावी लागेल.

या बैठकीत कर्जत तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांनी शिवसेना (शिंदे गट) बाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. पक्षांतर्गत निर्णय घेताना मंडळ अध्यक्ष आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेतले जात नसल्याची खंत मंडळ अध्यक्ष राजेश लाड यांनी स्पष्ट शब्दांत मांडली. स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांच्या भावना आणि मतांचा सन्मान न झाल्यास पक्ष संघटनेवर विपरीत परिणाम होऊ शकतो असा इशारा दिला. मंडल अध्यक्ष दिनेश रसाळ यांनी आक्रमक भूमिका घेत हीच वेळ आहे, आता भाकरी फिरवण्याची. आता नाही तर कधीच नाही असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. स्थानिक स्वराज्य संस्थांमधूनच खऱ्या अर्थाने जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडता येते, त्यामुळे या निवडणुका गांभीर्याने घ्याव्यात, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेससोबत युती करण्यासाठी हात वर केले, मात्र शिवसेना शिंदे गटासोबत जाण्यासाठी एकाही कार्यकर्त्याने हात वर केला नाही. या प्रतिक्रियेमुळे कर्जत ग्रामीण तसेच कर्जत शहर भागात भाजप कार्यकर्त्यांची शिंदे गटाविषयी उघड नाराजी स्पष्टपणे समोर आली आहे.



# असले कसले हे भक्त

दुसऱ्या धर्माचा द्वेष माणसांना कोणत्या थराला घेऊन जाऊ शकतो याचे भयंकर उदाहरण अलिकडेच काश्मिरात पाहायला मिळाले. जम्मूमधील एका वैद्यकीय महाविद्यालयामध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांची संख्या हिंदूंपेक्षा जास्त असल्याच्या रागातून त्याच्याविरुध्द नाना तक्रारी करण्यात आल्या व अखेर ते कॉलेज बंद पाडण्यात आले. एरवी आपल्या भागात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावे अशी लोकांची मागणी असते. पण जम्मूसारख्या मोठ्या शहरातील कॉलेज हिंदू मंडळींनी बंद पाडले. इतकेच नाही तर ते बंद झाल्यानंतर नाच-गाणी करून आनंद व्यक्त केला. काश्मीरमध्ये वैष्णोदेवी हे प्रसिध्द मंदिर आहे. तेथे देशभरातून लाखो भाविक येत असतात. ही देवी नवसाला पावते असे मानले जाते. या देवीचे दर्शन घडण्यासाठीही एक वेळ यावी लागते असे मानले जाते. चलो बुलावा आया है माता ने बुलाया है हे प्रसिध्द गाणे हीच भावना व्यक्त करते. माता म्हणजे आई. आणि ही तर साक्षात देवी. ही कधीही कुणाला दुसऱ्यांचा द्वेष करायला शिकवत असेल असे वाटत नाही. पण या मातेचे भक्त मात्र विचित्र निघाले. जम्मूतील कटरा इथे स्थापन झालेले वैद्यकीय महाविद्यालय वैष्णोदेवी मंदिर ट्रस्टच्या देणगीतून उभे राहिले होते. त्यामुळे तिथे फक्त हिंदू विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळायला हवा असे वैष्णोदेवीच्या तथाकथित भक्तांचे म्हणणे होते. हे भक्त म्हणजे स्थानिक हिंदू व्यापारी, कंत्राटदार, हॉटेलवाले असे लोक आहेत. ते सर्व भाजप आणि संघ परिवाराशी संबंधित आहेत. त्यांनी या मागणीसाठी आंदोलन सुरु केले. त्याला देशभर प्रसिध्दी देण्यात आली. कॉलेजमध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला म्हणजे त्यांनी जणू गुन्हा केला किंवा चोऱ्या केल्या असाच जणू आंदोलकांचा आविर्भाव होता. या भक्तांच्या तमाशाला केंद्र सरकारचा छुपा पाठिंबा होता. त्यामुळेच नॅशनल मेडिकल कौन्सिलने या कॉलेजची अचानक तपासणी केली. पुरेसे शिक्षक नाहीत, रुग्णांची संख्या पुरेशी नाही वगैरे कारणे देऊन इथला एमबीबीएसचा अभ्यासक्रम बंद करण्यात आला.

## मेडिकल कौन्सिलचा पक्षपात

हा अभ्यासक्रम यंदाच सुरु झाला होता. नोव्हेंबरमध्येच त्याचे पहिले वर्ष सुरु झाले होते. त्याला पन्नास विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. कॉलेज सार्वजनिक असो की खासगी, सध्या सगळे प्रवेश नीट या प्रवेश परिक्षेतील गुणवत्ता यादीनुसारच होत असतात. नीट ही परीक्षा किती भयंकर कठीण आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे. या कॉलेजात प्रवेश घेणारे ५० पैकी ४४ विद्यार्थी मुस्लिम होते व ते सर्व नीट परिक्षेत गुणवत्ता यादीमध्ये आलेलेच होते. त्यांना वेगळे आरक्षण दिलेले नव्हते. केवळ पाच विद्यार्थी हिंदू व एक शीख होता. यातूनच हिंदू समाजाचा अहंकार दुखावला गेला. पैसा वैष्णोदेवीचा, म्हणजे हिंदूंचा आणि त्यावर मुस्लिम शिकणार असा अत्यंत विद्वेषी प्रचार केला गेला. मेडिकल कौन्सिलचे सर्व नियम पाळूनच प्रवेश दिले गेले होते व त्यांनीच भरपूर पाहण्या व तपासण्या करून कॉलेजला एमबीबीएस अभ्यासक्रमाची परवानगी दिली होती. त्यामुळे हे प्रवेश रद्द करणे सोपे नव्हते. म्हणून मग कॉलेजविरुध्द तक्रारी केल्या गेल्या. कॉलेजात पुरेशा सुविधा नाहीत असे म्हटले जाऊ लागले. पुरेशा संख्येने शिक्षक नाहीत हेही सांगितले जाऊ लागले. हेच निकष लावायचे तर देशातली साठ टक्के कॉलेजे बंद करावी लागतील. कारण लोकांना भुलवण्यासाठी किंवा नेत्यांना पैसे मिळवून देण्यासाठी देशातील अनेक राज्यात प्रत्येक जिल्ह्यात एकेक मेडिकल कॉलेज सुरु करण्यात आले आहे. धड इमारती नाहीत, प्रयोगशाळा नाहीत, प्राध्यापक कधीतरी व तेही बाहेरच्या शहरातून येतात अशी अनेकांची अवस्था आहे. विद्यार्थ्यांना रुग्णांचा अभ्यास करता यावा यासाठी प्रत्येक कॉलेजला एक मोठे सरकारी इस्पितळ जोडलेले असावे लागते. पण बहुसंख्य ठिकाणी या इस्पितळांची अवस्थाच वाईट आहे. एकूण या कॉलेजांमधून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना काय शिक्षण व अनुभव मिळत असेल हा शंकास्पदच प्रकार आहे. त्या मानाने वैष्णोदेवी कॉलेजची अवस्था बरी होती. दुसरे म्हणजे मेडिकल कौन्सिलतर्फे एका दमात तपासणी व लगेच कारवाई असे कधीच होत नाही. आधी कॉलेजला सुधारण्याची संधी दिली जाते. दोन तीन वेळा तपासणी पथके पाठवली जातात व नंतरच असा निर्णय घेतला जातो.

## निव्वळ आंधळा द्वेष

वैष्णोदेवीमध्ये मात्र अचानक तपासणी केली गेली व तात्काळ अभ्यासक्रम बंदचा आदेश काढण्यात आला. यामुळे आता ५० विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागणार आहे. आता त्यांना इतर वैद्यकीय कॉलेजांमध्ये सामावून घेतले जाणार आहे. याचाच अर्थ विद्यार्थ्यांची सर्व घडी विस्कटणार आहे व अधिकचा खर्चही त्यांना करावा लागणार आहे. मानसिक त्रास वेगळाच. वास्तविक काश्मीरमध्ये दहशतवादाचे सावट असताना तिथले ४४ मुस्लिम युवक नीटची परिक्षा उत्तीर्ण करून प्रवेश मिळवतात ही एक अभिमानास्पद गोष्ट असायला हवी होती. ३७० वे कलम रद्द केल्यानंतर काश्मिरातील स्थिती किती सुधारली आहे ते दर्शवणारी घटना म्हणून भाजप सरकारला याचे श्रेयही घ्यायला हरकत नव्हती. त्यांचे डोके जाग्यावर असते तर त्यांनी ते केले असते. पण प्रत्यक्षात मुस्लिमांच्या द्वेषाने हिंदू म्हणवणारे हे मोदी-भक्त इतके आंधळे झाले आहेत की, त्यांनी हे कॉलेज बंद पाडले. जम्मूतील स्थानिक हिंदू कार्यकर्त्यांना अक्कल नसेल तरी दिल्लीतून मोदी, शाह किंवा भागवत यांनी त्यांना शहाणपणाचे शब्द ऐकवायला पाहिजे होते. पण ते गप्प राहिले व त्यांनी यांना अप्रत्यक्ष पाठिंबाच दर्शवला. गंमत म्हणजे या कॉलेजचे चालकही इतकेच अंधभक्त आहेत असे दिसते. इथल्या प्रवेशांमध्ये मुस्लिमांची संख्या अधिक राहण्याची शक्यता आहे हे जेव्हा त्यांच्या लक्षात आले तेव्हा इथले १०० टक्के प्रवेश अखिल भारतीय स्तरावरच्या गुणवत्ता यादीतून करावेत अशी विनंती केली होती. तसे झाले असते तर देशभरातील हिंदू विद्यार्थ्यांनी इथे प्रवेश घेतला असता. पण मेडिकल कौन्सिलच्या नियमानुसार ८५ टक्के प्रवेश हे स्थानिक राज्यातल्या विद्यार्थ्यांनाच द्यावे लागतात. त्यामुळे त्यांनी चार वेळा विनंती होऊनही ती फेटाळली. पण त्यावेळी बाहेर इतके आंदोलन होऊ शकेल हे बहुदा त्यांच्या लक्षात आले नाही. नंतर प्रत्यक्ष प्रवेश झाल्यावर हिंदू संघटनांचे आंदोलन सुरु झाले तेव्हा मग काश्मीरचे हिंदू राज्यपाल आणि केंद्रातले हिंदू सरकार हे सावध झाले व त्यांनी कॉलेज बंद पडेल अशी व्यवस्था केली. एरवी, मुस्लिम लोक शिकत नाहीत, गुन्हेगारीच्या मार्गाला लागतात म्हणून संघ परिवारवाले त्यांच्याविरुध्द दुष्ट प्रचार करीत असतात. त्यांनी मेनस्ट्रीममध्ये यावे असे सांगत असतात. पण मुस्लिम विद्यार्थी नीटची परीक्षा देऊन रीतसर शिकायला आले तर मात्र हे लोक त्यांना सरळपणे शिकू देत नाहीत असाच संदेश यातून गेला आहे. द्वेषाने बुध्दी आंधळी होते ती अशी.

विचार

# देशाचे लक्ष वेधणारी निवडणूक

***देशात काही व्यक्तिमत्वे नेहमी चर्चेत असतात. त्यांच्या राजकीय भूमिकांची, विधानांची आणि धोरणांची नोंद घेतली जात रहाते. ठाकरे बंधू यापैकीच एक. उद्धव ठाकरे आज सत्तेत नसले आणि त्यांचा पक्ष अगदीच अडचणीत असला तरी त्यांची नोंद सतत घेतली जाते. राज ठाकरे यांचा तर महाराष्ट्रात एकही आमदार नाही की एकाही पालिकेवर नियंत्रण नाही; तरीही त्यांची मनोगते चर्चेत असतात. त्यांचे एकत्र येणे नेमके काय साधणार?***



**महेश जोशी**

देशात काही व्यक्तिमत्वे नेहमी चर्चेत असतात. प्रकाशझोतात असो वा नसो, ती चकाकत राहतात. ठराविक राज्यात कार्यरत आहेत, म्हणून दुर्लक्ष केले जात नाही, तर त्यांच्या राजकीय भूमिकांची, विधानांची आणि धोरणांची नोंद घेतली जात रहाते. ठाकरे बंधू यापैकीच एक. उद्धव ठाकरे आज सत्तेत नसले आणि त्यांचा पक्ष अगदीच अडचणीत असला तरी त्यांची नोंद सतत घेतली जाते. राज ठाकरे यांचा तर महाराष्ट्रात एकही आमदार नाही की एकाही पालिकेवर नियंत्रण नाही; तरीही त्यांची मनोगते चर्चेत असतात. येत्या पंधरा जानेवारी रोजी महाराष्ट्रातील २९ महापालिकांसाठी मतदान होणार आहे. वाट्टेल ते करून का होइना, मुंबई महापालिकेवर सत्ता काबीज करायची रणनिती भाजपाने आखली आहे. राज्य व केंद्रात सत्ता असुनही भाजपाला मुंबईवर स्वबळावर कधी सत्ता मिळवता आली नाही. राज्यात सत्ता असुनही मुंबईला भाजपाचा महापौर देता आला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बरोबर घेऊन मुंबई महापालिकेवर युतीची सत्ता स्थापन करण्यासाठी सर्वस्व पणाला लावले आहे. उबाठा सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी वीस वर्षाची कटुता विसरून महापालिका निवडणुकीसाठी युती केल्याचे जाहीर केल्याने देवाभाऊ विरूध्द ठाकरे बंधू असा सत्ता संघर्ष सुरू झाला आहे. मुंबई महापालिकेचे या वर्षीचे बजेट ७५ हजार कोटी रुपये आहे. पुढील वर्षी ते ९० हजार कोटी होऊ शकते. मुंबई महानगर प्रदेशात मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, वसई-विरार, मिरा-भायंदर, भिवंडी-निजामपूर, उल्हासनगर, पनवेल अशा महापालिकांचे मिळून एक लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त बजेट आहे. म्हणूनच भाजपाला या सर्व महापालिकांवर सत्ता काबीज करायची आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली शिवसेना आज एकनाथ शिंदेंच्या ताब्यात आहे. निवडणूक आयोगाने त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह बहाल केले आहे. शिंदे आणि त्यांचा पक्ष भाजपाबरोबर सत्तेत भागीदार आहे. दुसरीकडे, पक्षाचे नाव गमावलेले उद्धव ठाकरे व बंधू राज ठाकरे हे दोघे कुठेही सत्तेत नाहीत. देवाभाऊ आणि एकनाथभाई यांच्याबरोबर राज्याची बलाढ्य सत्ता आहे. केंद्राचा त्यांना भक्कम पाठिंबा आहे. दुसरीकडे, शिवसेनाप्रमुखांची पुण्याई आणि ठाकरे नावाचा ब्रँड बरोबर घेऊन उद्धव आणि राज यांना महापालिका निवडणूक लढवावी लागत आहे. प्रादेशिक आणि भाषिक अस्मिता या मुद्द्यांवर करूणानिधी, जयललिता, एम. के. स्टॅलिन किंवा चंद्राबाबू नायडू यांनी दक्षिणेत सत्ता काबीज केली, ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये वर्चस्व निर्माण केले. पण शिवसेनाप्रमुखांना किंवा त्यांनी स्थापन केलेल्या पक्षाला तसे यश महाराष्ट्रात कधीच संपादन करता आले नाही. मुंबई महापालिकेत शिवसेनेचे सर्वाधिक म्हणजे ९४ नगरसेवक एकदा निवडून आले होते. २०१७ मध्ये शिवसेनेचे ८४ नगरसेवक होते. ठाकरे बंधुंच्या दोन्ही पक्षांना मिळून या संख्येच्या जवळपास तरी यश मिळू शकेल का, याची जोरदार चर्चा सुरु आहे.

ठाकरे बंधुंची युती झाली म्हणून दोन्ही पक्षांच्या सैनिकांनी मुंबई-महाराष्ट्रात गुलाल उधळून जल्लोश साजरा केला, मिठाई वाटली. पण नाशिक येथे रात्री जल्लोश करणारे उबाठा सेनेचे दोन माजी महापौर दुसऱ्या दिवशी मंत्री गिरीश महाजनांच्या साक्षीने भाजपात दाखल झाले. भाजपाबरोबर युती करून निवडणूक लढवणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी भाजपाला चाट देऊन काँग्रेसबरोबर सत्ता स्थापन केली होती. मग रात्री ठाकरे बंधुंच्या नावाने जयजयकार करणारे दिवस उजडताच भाजपात गेले तर त्यांना अडवणार तरी कोण? ठाकरे बंधू एकत्र झाल्याचा आनंद सर्वांना झाला, बरे झाले, कटुता संपली अशीच भावना सर्वत्र आहे. पण शिवसेनाप्रमुखांच्या हयातीनंतर या बंधुंचे जनसंपर्क, संघटन आणि जनमानसात विश्वासार्हता किती आहे, हा कळीचा मुद्दा आहे. देशात मोदी पर्व सुरू झाल्यानंतर २०१५ ते २०१८ या काळात राज्यात झालेल्या महापालिका निवडणुकीमध्ये भाजपाने विलक्षण घोडदौड केली. या काळात २७ महापालिकांमध्ये भाजपाचे २७३४ पैकी १०९९ नगरसेवक निवडून आले. पुणे, नागपूर, पिंपरी-चिंचवड, नाशिकमध्ये भाजपाने मुसंडी मारली. याच काळात अविभाजित शिवसेनेचे ४८९, काँग्रेसचे ४३९ , अविभाजित राष्ट्रवादी काँग्रेसचे २९४ , मनसेचे ३६ , बसपाचे ३८ आणि ८९ अपक्ष नगरसेवक होते. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकवल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाचा पोतच बदलला. त्यानंतर वर्षभरात अजितदादा पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादीचे विभाजन झाले. त्यामुळे लवकरच होणाऱ्या महापालिका निवडणुकीशी अगोदर झालेल्या निवडणुकांची तुलना करणे योग्य होणार नाही. निवडणुका जाहीर झाल्या की ठाकरेंच्या पक्षाकडून मुंबई महाराष्ट्रापासून तोडली जाणार आहे आणि मुंबईतील मराठी माणूस धोक्यात आहे, अशी आवई उठवली जाते. मराठी माणसाचे रक्षणकर्ते आपणच आहोत, असे भासवले जाते. मुंबईत मराठी माणूस परप्रांतीयांच्या गर्दीत घुसमटतो आहे हे वास्तव आहे. मुंबईत आता जेमतेम पंचवीस-तीस टक्के तरी मराठी भाषिक उरले आहेत का, हे जनगणना झाल्यानंतरच समजू शकेल.

गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये मुंबईतील हिरे उद्योगापासून अनेक उद्योग-व्यवसाय अन्य राज्यांमध्ये हलवले गेले. मुंबई-महाराष्ट्रात येणारे मोठे उद्योगही दुसऱ्या राज्यात वळवले गेले. मराठी भाषिकांना गुजराती वसाहतीत फ्लॅट नाकारले गेल्याच्या अनेक घटना अधून मधून घडतात. संघ परिवारातील एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने घाटकोपरला येऊन गुजराती प्रेम व्यक्त केले होते. महाराष्ट्राच्या माजी राज्यपालांनी तर गुजराती-मारवाडी लोक मुंबई चालवतात, असे भाष्य केले होते. महायुती सरकारकडूनच महाराष्ट्रात शाळांमधे हिंदी भाषा सक्तीने लादण्याचा प्रयत्न केला गेला. बेरोजगार मराठी तरूणांची संख्या प्रचंड आहे आणि रस्ते व पदपथांवर अमराठी फेरिवाल्यांचे सर्वत्र आक्रमण आहे. मुंबईतील मराठी शाळा धडाधड बंद होत असून शाळांच्या जागा बिल्डर्सना दिल्या जात आहे, त्या विरोधात काढण्यात येणाऱ्या मोर्चाला पोलीस परवानगी नाकारतात. असे अनेक मुद्दे आहेत की मराठी माणूस महाराष्ट्राच्या राजधानीत उपेक्षित आहे. ठाकरे बंधुंनी मराठीचा मुद्दा निवडणुकीच्या निमित्ताने मांडला, पण मराठी माणसाच्या हितासाठी ते काय करू शकतात, याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. मराठीच्या मुद्यावर केवळ भावनेला हात घालून मते मिळवण्याचे दिवस आता राहिलेले नाहीत. ठाकरे बंधुंच्या संयुक्त पत्रकार परिषदेचा मोठा गाजावाजा झाला. मिडियाने त्याला मोठी प्रसिध्दी दिली. दोन्ही बंधु घरातून निघाल्यापासून मराठी वृत्तवाहिन्यांनी थेट प्रक्षेपण केले. जणू पुतिन व झेलन्स्की भेटतात एवढे महत्व ठाकरे बंधुंना दिले, अशी खिल्ली स्वत: देवाभाऊंनी उडवली. पण वरळीला झालेली पत्रकार परिषद युतीची घोषणा करून अवघ्या दहा मिनिटांतच त्यांनी का गुंडाळली हे समजले नाही.

एकत्र आल्यानंतरही ‘आम्ही का एकत्र आलो’ हे ठाकरे बंधूंनी सांगितले नाही. आमचा कार्यक्रम काय, कोण किती जागा लढवणार, वादापेक्षा महाराष्ट्र मोठा म्हणजे नेमके काय म्हणायचे आहे, मातोश्रीवरचे बडवे व कारकून हा विषय आता संपला का, याचा उलगडा झाला नाही. मनसेने तर गेल्या एकोणीस वर्षांमध्ये आठ-दहा वेळा तरी राजकीय भूमिका बदलल्या असतील, त्यांनी मोदींना पाठिंबा का दिला, का काढला, हे नेमकेपणाने समोर आलेच नाही. मनसेच्या भूमिकेत एकसंघपणा नाही. मग ठाकरे बंधुंची घोषणा ही महापालिका निवडणुकीपुरतीच आहे काय? भाजपासारख्या बलाढ्य पक्षाशी फार काळ लढू शकणार नाही, याची कल्पना दोन्ही बंधुंना असणारच. उध्दव ठाकरेंच्या पक्षाने अगोदर वर्षानुवर्षे भाजपाबरोबर निवडणूक लढवली, नंतर काँग्रेसबरोबर सत्ता उपभोगली आता या दोन्ही राष्ट्रीय पक्षांच्या विरोधात महापालिका निवडणुकीत लढण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.ठाकरे बंधुंची पत्रकार परिषद होती की फॅमिली फोटोसेशन होते अशीही चर्चा नंतर झाली. रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे, शर्मिला ठाकरे आणि अमित यांच्यासह व्यासपीठावर ठाकरे बंधुंचे फोटोसेशन पार पडले. पत्रकार परिषदेत मुंबईच्या व मुंबईकरांच्या कोणत्याही मुद्यावर चर्चा झाली नाही. युती केवळ मुंबई-ठाण्यापुरतीच आहे की इतरत्रही, याचेही उत्तर मिळाले नाही. स्वत:चे अस्तित्व टिकवण्यासाठी दोन नेते एकत्र आलेत, हा प्रितीसंगम नव्हे, भितीसंगम अशी टिंगल केली गेली. ठाकरे म्हणजे मराठी नाही आणि ठाकरे म्हणजे मुंबईही नाही, असा षटकार नंतर देवाभाऊंनी मारला. एकंदरीत, ठाकरे बंधूंचे एकत्र येणे काय साधते, ते आता बघायचे.

# गुन्हे उघडकीत श्वान पथकाचे योगदान

**अंतरा पारंगे**

विशिष्ट वासावरून अंमली पदार्थ आणि स्फोटके शोधणे, पळून गेलेल्या किंवा लपलेल्या गुन्हेगारांचा माग काढणे, आपत्कालीन परिस्थितीत (उदा. भूकंप, पूर) अडकलेल्या लोकांना शोधणे, महत्त्वाच्या ठिकाणी किंवा कार्यक्रमांमध्ये सुरक्षा पुरवणे, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या कामांमध्ये श्वान पथकाचे योगदान मोलाचे राहिले आहे. गुन्हे उघडकीस करण्यामध्ये पोलिसांबरोबरच पोलीस दलातील श्वान पथकाचा सिंहाचा वाटा आहे. रायगड पोलीस दलातील श्वान पथक गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरले आहेत. एखादी घडणारी मोठी दुर्घटना रोखण्यात श्वान पथकाला यश आले आहे. ज्या पध्दतीनेआधूनिक युगामध्ये कोणतीही माहिती हवी असल्यास गुगलवर सर्च करून मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. त्याच पध्दतीने रायगड पोलीस दलातील श्वान पथकाने अगदी कमी वेळेत गुन्हेगारांचा शोध घेऊन त्यांची माहिती पोलिसांना देण्याचे काम केले आहे.

रायगड पोलीस दलातील श्वान पथकाने या वर्षात दमदार कामगिरी करीत अंमली पदार्थ तस्करीसह अपहरण व अन्य गुन्ह्यांची उकल केल्याची माहिती समोर आली आहे. रायगड पोलीस दलातील पोलीस अधीक्षक यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न केला जातो. जिल्ह्यात आठ पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालय, २८ पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाणे, आर्थिक गुन्हे शाखा, तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आहे. जिल्ह्यात दोन हजार ३००हून अधिक पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. जिल्ह्यातील गुन्हेगारीसह गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्याचे काम रायगड पोलीसांमार्फत कायमच केले जाते. अपहरण, चोरी, घरफोडी, खून अशा अनेक प्रकारच्या गुन्हे रायगड पोलीस उघडकीस आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करतात. जिल्ह्यासह राज्यातील व राज्याबाहेरील टोळीला जेरबंद करण्याचे कामही पोलिसांमार्फत करण्यात आले आहे.

पोलिसांच्या मदतीसाठी रायगड पोलीस दलात डॉग स्कॉड ही एक स्वतंत्र यंत्रणा आहे. या पथकामार्फत गुन्हेगारांचा शोध घेण्याचे काम केले जाते. रायगड पोलीस दलात मर्फी, ऑस्कर, रॉकी, रुफस नावाचे श्वान आहे. एखादी घटना घडल्यावर या श्वान पथकाद्वारे गुन्ह्याची माहिती घेण्याचे काम केले जाते. जिल्ह्यात पेण, पोयनाड, पाली, रेवदंडा, मूरूड, अलिबाग या पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीसह अंमली पदार्थांची तस्करीचे गुन्हे दाखल झाले होते. श्वान पथकातील मर्फी, ऑस्कर, रॉकी, रुफस यांनी आपल्या शैलीने या गुन्ह्यांची उकल काही तासांमध्येच केली. एकूण आठ गुन्हे उघडकीस आणण्यास या पथकाला यश आले असून डॉग स्कॉड गुन्हेगारांचे कर्दनकाळ ठरले आहेत.

पंतप्रधानांपासून राष्ट्रपती, मुख्यमंत्री व इतर अति महत्वाच्या व्यक्तींच्या सुरक्षेसाठी रायगडमधील श्वान पथकाची कामगिरी मोलाची ठरली आहे. राजकीय सभांसह वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांची उकल करण्यासाठी श्वान पथकाची मदत कायमच घेतली जाते. एखाद्या ठिकाणी चोरी, घरफोडी तसेच खूनसारख्या घटना घडल्यास, आरोपीपर्यंत पोहचण्यासाठी श्वान पथकाला पाचारण केले जाते. गुन्हा घडलेल्या ठिकाणी असलेल्या एखाद्या संशयीत वस्तूचा वास देऊन आरोपीपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे पोलीस दलात श्वान पथकालादेखील महत्व आहे. एक वर्षाच्या श्वानाला पोलीस दलात रुजू केल्यानंतर त्याला प्रशिक्षणासाठी पाठविले जाते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला सेवेत रूजू केले जाते. त्यामुळे पोलीस दलातील अविभाज्य घटक म्हणून श्वान पथकाकडे पाहिले जाते. लहानाचा मोठा करीत असताना श्वानाला पोलीस दलातील शिस्त, नियम यांची माहिती दिली जाते. महत्वाचे, अतिमहत्वाच्या व्यक्ती यांच्या सुरक्षेची जाणीव करून दिली जाते. त्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षकांची नेमणूक केली जाते.

पोलीस दलात मॅक्स या श्वानाची चांगली कामगिरी राहिली आहे. रायगड पोलीस दलात १७ मार्च २०१८ मध्ये रुजू झाला. रायगड पोलीस दलातील श्वान पथकामध्ये आठ वर्ष दहा महिने तीन दिवस सेवा केली. टेकनपूरच्या राष्ट्रीय श्वान प्रशिक्षण केंद्र (बीएसएफ) येथे प्रशिक्षण पुर्ण केले. ४३६ व्हीव्हीआयपी कॉल, व ४०० व्हीआयपी बंदोबस्त मॅक्सच्या माध्यमातून झाले आहेत. पेण बस स्थानकातील थ्रेड कॉल, माणगाव, रोहा, खालापूर येथील गावठी बॉम्ब शोध, श्रीवर्धन, अलिबाग समुद्रकिनाऱ्यावरील स्मोकर सेल, रेवदंडा येथील बोयावरील जीपीएस शोधण्यासाठी मॅक्सचे मोलाचे योगदान राहिले आहे. मॅक्सने आतापर्यंत ७८ बक्षीसे प्राप्त केली आहेत. २०२३ मध्ये झालेल्या कोकण कर्तव्य मेळावा स्पर्धेमध्ये त्याने प्रथम क्रमांक मिळविला होता. रायगड पोलीस दलात कार्यरत असणाऱ्या मॅक्सचे (दि.१३) सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. शासकीय इतमामात त्याचे अंत्यसंस्कार करण्यात आले.

लोकसंसद

## “सांस्कृतिक महासत्तेच्या उदयाची नांदी”

जगप्रसिद्ध सोमनाथ मंदिरावर मोगलांनी केलेल्या पहिल्या आक्रमणाला एक हजार वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने सोमनाथ स्वाभिमान पर्वाचे आयोजन करण्यात आले. आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की सोमनाथ मंदिर नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले पण कुणीही ते नष्ट करू शकले नाही, इतके त्या मंदिराचे आणि श्री सोमनाथाचे अद्भुत सामर्थ्य आहे. वर्ष १०२६ मध्ये सोमनाथ मंदिरावर पहिले जिहादी आक्रमण झाले तेव्हापासून आजपर्यंत म्हणजे १००० वर्षातील या मंदिराची वाटचाल खरोखरच बुद्धीअगम्य अशी आहे. यातून सनातन धर्माचे अविनाशत्व सिद्ध होते. भारतातील बारा ज्योतिर्लिंगाच्या स्तोत्रा मध्ये सर्वात आधी श्री सोमनाथाचा उल्लेख केला जातो. असे शिवलिंग असलेल्या मंदिराचे चैतन्य महापापी लोकांना कसे सहन होईल? त्यातूनच या मंदिरावर आक्रमणे करून ते नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला गेला. औरंगजेब, गझनी आदी आक्रमकानी जितक्या वेळा या मंदिरावर आक्रमण केले तितक्या वेळेला ते पुन्हा त्याच डौलाने उभे राहिले. पाकिस्तानचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री शहा मोहम्मद कुरेशी यांनी वर्ष २०२१ मध्ये मी गझनीचा वंशज असल्याने पुन्हा सोमनाथ मंदिर पाडणार अशी गरळओक केली. वर्ष २०२३ मध्ये ऑल इंडिया इमाम असोसिएशनचे अध्यक्ष मौलाना मोहम्मद साजिद रशीद यांनी सोमनाथ मंदिर पाडून गझनी नी कोणतीही चूक केली नाही असे संतापजनक विधान केले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून आज तागायत जिहादी प्रवृत्तीचे लोक हिंदूंच्या मंदिरावर आक्रमण करत आहे, मूर्तींची तोडफोड, विटंबना करत आहे,वेगवेगळे जिहाद करून हिंदूंवर अत्याचार,आया बहिणींची अब्रू लुटत आहे, धर्म विचारून हत्या केली जात आहे, बल पूर्वक धर्मांतर करत आहे. इतिहासातील अन्यायातून शिकून भविष्यातील अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा होणे आवश्यक आहे. ज्यांना स्वतःचा इतिहास माहीत नसतो ते भविष्यात स्वतःचे रक्षण करू शकत नाही. काळ कितीही कठीण असला तरी सत्य सनातन कधीही पुसले जात नाही. अयोध्येतील श्रीराम मंदिर, काशीचा कायाकल्प आणि आता श्री सोमनाथाचा गौरव सोहळा ही सांस्कृतिक महासत्तेची नांदी आहे. देव, देश आणि धर्म यांच्यावरील आघातांच्या विरोधात हिंदूंनी जागृत होणे आवश्यक आहे. नुसते जागृत होऊन चालणार नाही तर सनातन धर्म, धर्मग्रंथ, देवता, संत, राष्ट्रपुरुष आणि सर्वसामान्य जनता आदींकडे वक्रदृष्टीने पाहण्याचे कुणाचे धाडस होणार नाही असा वचक निर्माण करणे आवश्यक आहे.

**लीना मकरंद गाडगीळ पनवेल**

विशेष

# इंडियन आर्मी डे



१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश स्वातंत्र्य झाला. देश स्वातंत्र्य करण्यासाठी लाखो ज्ञात -अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाचे बलिदान दिले. हजारो, लाखो स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानानंतर मिळालेले हे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी भारतीय लष्कराची आहे. भारतीय लष्कराने आपली जबाबदारी इमाने इतबारे पार पाडत देशातील परकीय आक्रमणे रोखून धरली. केवळ रोखून धरलीच नाही तर भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्या शत्रू राष्ट्रांना दाती तृण धरायला लावले.

भारतीय लष्कराविषयी देशातील १४४ कोटी जनतेला नितांत आदर आहे. भारतीय लष्कराचे भूदल, नौदल व वायुदल हे तीन प्रमुख विभाग आहेत. भूदल अर्थात भारतीय आर्मीचे जवान देशाच्या सीमांचे रक्षण करतात.

आज १५ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात भारतीय लष्कर दिन अर्थात इंडियन आर्मी डे म्हणून साजरा केला जातो. चला तर मग आजच्या भारतीय लष्कर दिनानिमित्त आपण या लेखातून भारतीय लष्कराची माहिती घेऊ या. भारतीय लष्कराचा मूळ पाया व अंतर्गत गाभा हा ब्रिटिश आर्मीवर आधारलेला आहे. याच ब्रिटिशांकडून १५ जानेवारी १९४९ ला तत्कालीन फील्ड मार्शल के एम करिअप्पा यांनी पदभार स्वीकारला त्यामुळे हा दिवस भारतीय लष्कर दरवर्षी आर्मी डे म्हणून साजरा करते. भारतीय लष्कर ही प्रशंसनीय काम केलेली सन्माननीय संस्था आहे व आंतरराष्ट्रीय पातळीवरही आपल्या लष्कराला मान आहे. भारतीय लष्कराची एक प्रतिमा आहे, ती चांगली आहे. भारतीय लष्कराची नेहमीच प्रशंसा झालेली असून लष्कराने देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय आव्हानांचा सामना करताना आदर्श कामगिरी केली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती रक्षक सेनेत भारतीय लष्कराची मोठी भुमिका आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने भारतीय लष्कराच्या कामाची नेहमीच स्तुती केली आहे.

भारतीय लष्कर हे केवळ शक्तिप्रदर्शनासाठी नाही. या संस्थेकडे एक परिपक्वता आणि जबाबदारीही आहे. भारतीय लष्कर हे आज जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर म्हणून ओळखले जाते. केवळ शत्रू राष्ट्रच नव्हे तर अमेरिका, रशिया, चीन यासारखी बलाढ्य राष्ट्रही भारतीय लष्कराची क्षमता जाणून आहे. देशातील १४४ कोटी जनतेचे रक्षण करण्यास भारतीय लष्कर सक्षम आहे. भारतीय लष्कराच्या सर्व जवानांना लष्कर दिनाच्या अर्थात इंडियन आर्मी डे च्या हार्दिक शुभेच्छा! तसेच देशासाठी शहीद झालेल्या भारतीय लष्कराच्या जवानांना विनम्र अभिवादन!! जय हिंद!!!

**श्याम ठाणेदार**

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१५ जानेवारी

१) श्रीम.वंदना परशुराम पाटील
घरत आळी, अलिबाग,
१५-१-१९४९

२) श्री.प्रकाश गणपत पाटील
कुरूळ-नवेनगर, अलिबाग
१५-१-१९५१

३)श्री.शशिकांत सदानंद फाटक
मु.गोंधळपाडा, अलिबाग
१५-१-१९५७

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

# आदिवासीवाडी समस्यांच्या गर्तेत

## • मोजक्याच सुविधा उपलब्ध असून प्रशासनाचे दुर्लक्ष; ग्रामस्थांचा आरोप

**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील आंबिवली आदिवासी वाडीची ५३० लोकसंख्या आहे. ही आदिवासी वाडी पेण मतदार संघात येते. या आदिवासी वाडीवर मोजक्या सुविधा उपलब्ध आहेत. ही वाडी समस्येच्या गर्तेत असून याकडे सामाजिक नेते तसेच प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

येथील युवक कार्यकर्ता तथा रोहा तालुका आदिवासी मोर्चा प्रमुख शशिकांत जगताप हे समाज बांधवांसाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. गेल्या आठ दिवसांपूर्वी या आदिवासी वाडीसाठी रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभाग अलिबाग यांच्याकडून ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेमार्फत दोन सोलर हाय मास्टर बसविले आहेत. आदिवासी महिलांच्या डोक्यावरील हंडा कमी करण्यासाठी गावापासून तीन मीटर अंतरावर बोरवेल मारली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी प्लास्टिकची टाकीही उपलब्ध करून दिली आहे. मात्र हे पाणी अपुरे पडत आहे. काही वेळा तीन किलोमीटर पायपीट करून पिण्याच्या पाण्यासाठी जावे लागते.



या वाडीसाठी जो रस्ता दिलेला आहे, त्या रस्त्याला अनेक खड्डे पडले असून रस्त्याची दयनीय अवस्था झालेली आहे. दुसरा रस्ता आहे तो कच्चा रस्ता असून अत्यंत खराब अवस्थेत आहे. तेथून प्रवास करणे तारेवरची कसरत आहे. पावसाळ्यात तर हा रस्ता चिखलमय होतो. तसेच, येथील स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. स्मशानभूमीला वर छप्पर नाही, चौथरा नाही, की निवारा शेड नाही. पावसाळ्यात जर एखाद्याचे निधन झाले, तर काय करावे, असा ज्वलंत प्रश्न ग्रामस्थांना पडतो. या वाडीतील मुलं, मुली दहावी व बारावी पास झाले आहेत. आर्थिक बाब कमी असल्यामुळे ती मुलं पुढील शिक्षण न घेता रोजंदारी करून आपल्या कुटुंबाला मदत करत असतात. या आदिवासी वाढीला मोजक्या सुविधा उपलब्ध असून जणू ही आदिवासी वाडी दुर्लक्षित आहे, असे आदिवासी बांधवांचे म्हणणे आहे. या वाडीकडे कोणी लक्ष देईल का? आवश्यक सुविधा उपलब्ध होतील का? स्थलांतरित कुटुंबांना काम मिळेल का? जेणेकरून ही कुटुंब स्थलांतरित होणार नाहीत आणि आपला हक्क मिळवतील, असे अनेक प्रश्न या आदिवासी बांधवांसमोर आहेत.

### शासकीय योजनांपासून वंचित

या आदिवासी वाढीतील ७० टक्के लोकांना घरकुल आहेत. मात्र तीस टक्के लोकांचे सातत्याने स्थलांतर होत असल्यामुळे, त्यांची कागदपत्रक उपलब्ध नसल्यामुळे अशी कुटुंब घरकुलापासून वंचित आहेत. हे ३० टक्के कुटुंब गणपती सण किंवा दिवाळी सण झाला कि कामानिमित्त स्थलांतरित होत असतात. एका वर्षांनी आपल्या गावी परत येऊन पुन्हा जातात. त्यांच्याकडे योग्य ती कागदपत्र नसल्यामुळे अशी कुटुंब घरकुलापासून वंचित राहिलेली आहेत. त्याचप्रमाणे कागदपत्र नसल्यामुळे तसेच फॉर्म न भरल्यामुळे या कुटुंबातील स्त्रिया लाडकी बहिण योजनेपासून वंचित आहेत. विधवा महिलांना पेन्शन सुद्धा भेटत नाही.

## लोकनेते दि. बा. पाटील जयंती साजरी

**| उरण | प्रतिनिधी |**

१३ जानेवारी २०२६ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या, वीर वाजेकर, आर्ट, सायन्स व कॉमर्स कॉलेज, महालण विभाग फुंडे येथे मंगळवारी (दि.१३) लोकनेते दि. बा. पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी लोकनेते दि. बा. पाटील यांच्याविषयी मनोगत व्यक्त करतांना प्राचार्य, डॉ. आमोद ठक्कर यांनी आपले अनुभव सांगितले. एक सर्वसामान्य कार्यकर्ता ते राष्ट्रीय नेता असा असामान्य प्रवास उलगडून दाखविताना दि. बा. पाटील यांचे शिक्षण, वकिली सामाजिक कार्यकर्ता आणि पुढे विधानसभा सदस्य ते संसदेपर्यंतचा प्रवास मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जीवन चरित्राचा आढावा घेताना त्यांच्या विविध क्षेत्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण योगदानाचा उल्लेख केला. तसेच विद्यार्थ्यांनी लोकनेते दि. बा. पाटील यांच्या कार्याची कास धरून पुढे वाटचाल करावी व त्यांच्या विचारांचा आदर्श ठेवून उत्तम नागरीक बनावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल पालवे, प्रा.गजानन चव्हाण तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक डॉ. सुजाता पाटील यांनी केले, तर डॉ. सी.डी. धिंदळे यांनी आभार मानले.

## आवरे विद्यालयात कृतज्ञता सोहळा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

आवरे शाळेच्या प्रांगणात एसएससी बॅच १९९९-२००० रौप्य महोत्सवानिमित्ताने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा कृतज्ञता सोहळा साजरा करण्यात आला. हिंदू संस्कृतीमध्ये आई-वडील, अतिथी आणि शिक्षक यांच्या ऋणाईमध्ये प्रत्येक जण असतो. त्या संस्कारावर प्रत्येक मुलाचे आणि मुलीचे आयुष्य हे ऐश्वर्या संपन्न, नीती संपन्न आणि चारित्र्यसंपन्न झालेले असते. त्या ऋणातून मुक्ती होण्यासाठी हा कृतज्ञता सोहळा करण्यात आला.

यावेळी माजी शिक्षकांचे विद्यार्थ्यांनी सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. दीप प्रज्वलन, ईशस्तवन, प्रास्ताविक, गुरुवंदना, शिक्षकांचे स्वागत, विद्यार्थ्यांचे मनोगत, शिक्षकांचा गुरु-शिष्य संवाद, शेवटी आभार प्रदर्शन झाले.



या अनुषंगाने माजी मुख्याध्यापक मनोहर पाटील, एन. आर पाटील, शरद केणी, कौशिक ठाकूर, प्रमोद घरत, अविनाश म्हात्रे, शोभा ढाके, संगीता ठाकूर, शकुंतला नारंगीकर, नरेश म्हात्रे, सुभाष ठाकूर, निवास गावंड, शेखर म्हात्रे, वायकोले, प्रकाश म्हात्रे तसेच शिक्षकेतर कर्मचारी कल्पना म्हात्रे, सदानंद म्हात्रे या गुरुवर्यांच्या तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत हा कृतज्ञता सोहळा साजरा करण्यात आला. काही कारणामुळे उपस्थित न राहिलेल्या सुरेश भेंडे, संतोष म्हात्रे, हरेश पाटील, गोपीनाथ ठाकूर या अध्यापकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## तटकरे महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**| तळा | प्रतिनिधी |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळाच्या वतीने बुधवारी (दि.१४) ग्रंथालय विभाग व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त भव्य ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृतीची जोपासना करणे, ज्ञानसंपादनाची आवड निर्माण करणे आणि मराठी साहित्याची ओळख करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. यावेळी मान्यवरांनी ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी केली व ग्रंथसंपदेचे कौतुक केले. या ग्रंथ प्रदर्शनात विविध विषयांवरील दुर्मिळ ग्रंथ, कथा, कादंबऱ्या, आत्मचरित्रे, स्पर्धा परीक्षांची पुस्तके तसेच शैक्षणिक व संदर्भ ग्रंथांची आकर्षक मांडणी करण्यात आली होती.

## मोफत नेत्र शिबिरात ९१ रुग्णांची तपासणी

### • ४५ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर बुधवारी (दि.१४) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९१ रुग्णांची तपासणी करून ४५ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४३ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत ३०५८ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजयशेठ मेथा हे समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवित असतात. नेत्ररोग शिबिराला दरमहिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ गरीब जनता घेत आहे.

गोरगरीब जनतेला दृष्टी मिळाल्याचा आनंद वेगळाच असून जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा समजून यापुढेही आपण हे शिबीर राबविणार असून माणगाव तालुका मोतीबिंदू मुक्त करण्याचा आपला मानस असल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले.

## तळा नगरपंचायतीकडून भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा नगरपंचायत प्रशासनाकडून भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करण्यात येत असल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. तळा नगरपंचायत क्षेत्रातील भटके श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करणे व त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देण्याची कार्यवाही करण्यासाठी पेट्स फोर्स पुणे या संस्थेची नेमणूक केली आहे.

या संस्थेमार्फत सद्यस्थितीत ४५ भटक्या श्वानांना पकडून त्यांच्यावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करून त्यांना रेबिज प्रतिबंधक लस देण्यात आली आहे. हा उपक्रम तळा नगरपंचायतीकडून दोन ते तीन टप्पा मध्ये करण्यात येणार आहे. त्याकरीता अर्थसंकल्पामध्ये तशी तरतुद करण्यात आलेली आहे.

भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात येण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. भटक्या श्वानांची संख्या नियंत्रणात आल्याने भटके श्वानांमुळे होणारा नागरीकांना त्रास कमी होणार आहे.

# महिलांनी आकाशाला गवसणी घालावी

### जिल्हाधिकारी किशन जावळे यांचे प्रतिपादन

**| पेण | प्रतिनिधी |**

मुलींनी केवळ शालेय व औपचारिक शिक्षणापुरते मर्यादित न राहता व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन पतंगासारखी आकाशाला गवसणी घालावी. ही भरारी घेत असताना केवळ रस्ता सुरक्षाच नव्हे तर सर्व प्रकारच्या सुरक्षिततेच्या कवचांचा लाभ घ्यावा, असे प्रतिपादन मा. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले. ते अंकुर ट्रस्ट, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पेणरायगड आणि आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित




महिला पतंग महोत्सव २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण, पेण नगराध्यक्ष प्रीतम पाटील, माजी जि.प. अध्यक्ष ॲड. नीलिमा पाटील, डॉ.अस्मिता पाटील, मार्विन डिसोजा आदी मान्यवर उपस्थित होते.

१३ वर्षांपूर्वी घडलेल्या निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरणानंतर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ.वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली महिला अत्याचार विरोधी मंचाची स्थापना करण्यात आली. या मंचामार्फत दरवर्षी उत्साहात महिला पतंगोत्सव साजरा करण्यात येतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील यांनी केले. पेण आरटीओ माधव सूर्यवंशी यांनी रस्ता सुरक्षा अभियानाची माहिती दिली. तर आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांनी आदिवासी मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व विशद केले. मा. जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते रस्ता सुरक्षिततेचा संदेश देणारा पतंग आकाशात सोडण्यात आला. त्यानंतर शेकडो तरुणींनी आपल्या रंगीबेरंगी इच्छाआकांक्षांचे पतंग आकाशात भिरकावले.

## भरत केदारी यांचे निधन

**रसायनी** : सावळे गावचे माजी सरपंच संजय केदारी यांचे काका व माजी सरपंच लक्ष्मण केदारी यांचे भाऊ भरत माया केदारी यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ६९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अंत्यविधीसाठी मोठा जनसमुदाय एकवटला. त्यांच्या पश्चात मुलगा प्रितम केदारी व प्रफुल केदारी, दोन कन्या, जावई, बहिणी, पुतणे, नातवंड व मोठा केदारी परिवार आहे. ते एचओसी कंपनीमध्ये अनेक वर्षे सेवा करून सेवानिवृत्त कामगार होते.

### ग्रामस्थांना निर्जंतूक पाण्याची सुविधा | विदेशी मान्यवरांची उपस्थिती

# निवी येथे यूव्ही वॉटर फिल्टरचे लोकार्पण

**| चणेरा | प्रतिनिधी |**

वरसे ग्रामपंचायत हद्दीतील निवी गाव व वाडीपाड्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरलेला महाराष्ट्रातील पहिलाच जपानी तंत्रज्ञानावर आधारित यूव्ही वॉटर फिल्टर प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा सोमवारी मोठ्या उत्साहात पार पडला. राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंतीचे औचित्य साधून आयोजित या कार्यक्रमात एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्या सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत हा नाविन्यपूर्ण व लोकहिताचा प्रकल्प यशस्वी झाल्याचे अधोरेखित करण्यात आले.

जपानमधील स्टॅन्ली कंपनीने विकसित केलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून बसविण्यात



आलेला हा यूव्ही फिल्टर प्रकल्प महाराष्ट्रात प्रथमच निवी गावात राबविण्यात आला आहे. सुरक्षित, स्वच्छ व निर्जंतुक पाणी ग्रामस्थांना सहज उपलब्ध व्हावे, हा या प्रकल्पामागील मुख्य उद्देश आहे. या उपक्रमासाठी जायका तसेच ओरिजनल इंजिनियरिंग कन्सल्टंट लिमिटेड यांनी आर्थिक पाठबळ दिले. तर विवेकानंद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूटने तांत्रिक व संशोधनात्मक सहकार्य केले आहे.

हा लोकार्पण सोहळा स्टॅन्ली कंपनीचे अध्यक्ष मासाहीकी इंचिचानगी सन, टोनी सन, युवासाकी सन, उगियोरा सन, एक्सेल इंडस्ट्रीजचे सेक्रेटरी सुरेंद्र संघवी, गटविकास अधिकारी शुभदा पाटील, माजी सरपंच अमित मोहिते, जायका कंपनीचे युसुके सातो सन, ओरिजनल इंजिनियरिंग कन्सल्टंटचे यामुनाची सन, हाचाकावा सन, तसेच श्री विवेकानंद रिसर्चचे सुशिल रुळेकर यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी निवी ग्रामस्थ, महिला व विविध क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंचायत समिती रोहा यांच्या मार्गदर्शनाखाली निवी गाव, निवी आदिवासी भाग, ठाकूरवाडी तसेच शासकीय रुग्णालय अशा सर्व सार्वजनिक ठिकाणी एकूण २१५ लहान-मोठ्या क्षमतेचे दोन प्रकारचे यूव्ही पाणी फिल्टर युनिट बसविण्यात आले आहेत. जवळपास तीन वर्षे या प्रकल्पावर संशोधन, विविध चाचण्या व ट्रायल घेण्यात आल्या. त्यानंतर हा प्रकल्प यशस्वी ठरला असून या संशोधन प्रक्रियेची सविस्तर माहिती लोकार्पण सोहळ्यात सादर करण्यात आली. यूव्ही फिल्टरचे फायदे, मर्यादा तसेच प्रत्यक्ष प्रयोगांचे अहवालही यावेळी दाखविण्यात आले.

जपानी तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेला हा फिल्टर भविष्यात कमी दरात सर्वसामान्यांसाठी कसा उपलब्ध करता येईल, याबाबत प्रयत्न सुरू असल्याचे विदेशी संशोधकांनी यावेळी सांगितले. या प्रकल्पामुळे निवी गाव व वाडीपाड्यांतील नागरिकांना आरोग्यदायी व स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# निवडक

## शैक्षणिक साहित्यनिर्मिती स्पर्धेत संजय थळे द्वितीय



**पाली/गोमाशी** : महाराष्ट्र राज्य शिक्षक शैक्षणिक साहित्य स्पर्धा सन २०२५-२६ या वर्षात महाराष्ट्रातील शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत महाराष्ट्रात केंद्रस्तर, तालुका, विभाग व राज्य पातळीवर गट विभागणी करण्यात आली होती. अध्ययन अध्यापनात शैक्षणिक साहित्यनिर्मिती करून विद्यार्थी विकास घडवावा, या दृष्टिकोनातून हा उत्तम उपक्रम राबविण्यात आला. या स्पर्धेत सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळेतील दिघेवाडी येथील शिक्षक संजय पांडुरंग थळे यांनी तयार केलेल्या दर्जेदार शैक्षणिक साहित्याची राज्यस्तरावर निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्यामध्ये शैक्षणिक साहित्य निर्मितीमध्ये रायगड जिल्हाचे नेतृत्व करत असताना राज्यात द्वितीय क्रमांकाची कमाई करत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा गोवण्यात आला. त्याबद्दल शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा प्राथमिक विभाग, गटशिक्षणाधिकारी सुधागड, ग्रामस्थ मंडळ दिघेवाडी तसेच शिक्षण विभाग सुधागड यांनी मनापासून कौतुक केले. त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण समाज माध्यमातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## 'ज्ञानकुल'चा प्रदर्शन सोहळा उत्साहात



**मुंबई :** सध्याच्या पिढीमध्ये वाढत चाललेले पाश्चात्य संस्कृतीचे आकर्षण, ढासळत चाललेली कुटुंबव्यवस्था, समाजातून हरवत चाल-लेली नैतिक मूल्ये, पर्यावरणाविषयीची असंवेदनशीलता यामुळे सामाजिक असमतोल निर्माण झाला आहे. ज्याचे परिणाम आज प्रत्येकाला भोगावे लागत आहेत. याविषयी जनमानसांत जागृती व्हावी आणि प्राणिमात्रांसह पशु पक्ष्यांचेही जीवन सुखकर व्हावे, हा उद्देश समोर ठेवून मुंबईतील चेंबूर येथील संवर्धन ज्ञानकुलम बालविकास संघाच्या वतीने 'ज्ञानकुलचा उत्थ-ानोत्सव प्रदर्शन सोहळा' हा तीन दिवसीय उपक्रम ९ ते ११ जानेवारीदरम्यान आयोजित करण्यात आला होता. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी विषयाला अनुसरून त्रिमिती प्रतिकृती मांडल्या होत्या. चित्रे, तक्ते आणि कोड्यांच्या माध्यमातून नागरिकांच्या सामाजिक जबाबदाऱ्यांचे सादरीकरण करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध संवादक, लेखक आणि कवी मनोज मुंतशिर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र प्रचारक सुमंत आमशेकर तसेच उद्योजक संजय हावरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. दुसऱ्या दिवशी भाभा अणुसंशोधन केंद्राचे वैज्ञानिक कृष्ण गुप्ता आणि प्रगती प्रतिष्ठानचे वीरेंद्र चंपानेरकर (जव्हार) यांनी प्रदर्शनास भेट दिली. तिसऱ्या दिवशी एअर मार्शल धनंजय वाणी तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कुटुंब प्रबोधन प्रमुख रवींद्र जोशी उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांनी सलग तीन दिवस सकाळी अकरा ते एक या वेळेत श्रीरामभजन, देशभक्तीपर गीते आणि शिवकालीन शस्त्रविद्येचे सादरीकरण केले. या प्रदर्शन सोहळ्यास परिसरातील विविध शाळांमधील दीड हजाराहून अधिक विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि नागरिकांनी भेट दिली.

## द.ग. तटकरे महाविद्यालयाचा सन्मान



### सेंटर ऑफ एक्सलन्स मानांकन

**माणगाव** : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथील आप्पासाहेब पवार सभागृहात बुधवारी (दि.७) विद्यार्थी संसदीय अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. यावेळी माणगाव येथील द. ग. तटकरे महाविद्यालयाला करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'सेंटर ऑफ एक्सलन्स' म्हणून गौरविण्यात आले. या मान्यवर सन्मानाचा स्वीकार महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक व मुंबई विभागीय सहसमन्वयक डॉ. बबन सिंगारे यांनी केला. करिअर कट्टा हा उपक्रम सध्या महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या संधींसाठी शहरात स्थलांतर करावे लागू नये, या उद्देशाने माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजूजी साबळे यांच्या दूरदृष्टीतून महाविद्यालयात सक्षम मार्गदर्शन व्यवस्था उभी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या सुप्त क्षमतेनुसार विविध करिअर संधी उपलब्ध करून देत त्यांना योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमाला मिळालेले सेंटर ऑफ एक्सलन्स मानांकन म्हणजेच या प्रयत्नांना मिळालेली यशस्वी पावती असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

## तलोशीमध्ये रक्तदान शिबीर



**महाड :** राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत तलोशी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले हे शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. या उपक्रमात ग्रामस्थांसह तरुण वर्गाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. या शिबिराचे आयोजन ग्रामपंचायत तलोशी तसेच जनकल्याण रक्त केंद्र महाड व मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत करण्यात आले होते. राजमाता जिजाऊ माँसाहेब यांनी समाजासाठी केलेल्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. शिबिरासाठी नजीकच्या शासकीय रुग्णालयाच्या रक्तपेढीचे सहकार्य लाभले होते. आरोग्य तपासणी करून पात्र रक्तदात्यांकडून रक्तसंकलन करण्यात आले. रक्तदानाबाबत जनजागृती करण्यासाठी माहिती फलक व मार्गदर्शन सत्राचे आयोजनही करण्यात आले होते. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून त्यामुळे अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात, असे मत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत तलोशी, तसेच जनकल्याण रक्त केंद्र महाड व मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तसेच स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांचे प्रमाणपत्र व अल्पोपहार देऊन आभार मानण्यात आले.

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# निवडक



## पेण येथे नेत्ररोग निदान शिबीर

**खरोशी :** शांतिलाल संघवी आय इन्स्टिट्यूट, मुंबई आणि बाफना फाऊंडेशन पेण रायगड यांच्या सहयोगाने आयोजित केलेल्या मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया आणि संपूर्ण नेत्ररोग निदान शिबीर मंगळवारी (दि. १३) जानेवारी रोजी जैन हॉल, बाजारपेठ पेण येथे आयोजित करण्यात आले होते. या मोफत तपासणी शिबिराचा लाभ अनेक पेण शहर व ग्रामीण भागातील नागरिकांनी घेतला. तपासणी केल्यानंतर चष्मा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात आला आहे. मागील तीन महिन्यापासून बाफना फाऊंडेशनच्या वतीने नेत्र चिकित्सा शिबीर आयोजित करण्यात येत असून आजपर्यंत ३०० पेक्षा जास्त रुग्णांची शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्याचबरोबर शेकडो नागरिकांना चष्म्याचे वाटप करण्यात आले आहेत. आजही रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले आहे तरी शहरी आणि ग्रामीण भागातील जास्तीत जास्त नागरिकांनी या नेत्र चिकित्सा शिबिराचा लाभ घ्यावा आणि आपले आरोग्य उंचवावे असे आवाहनही करण्यात आले आहे.

## ‘डी.एड, बी.एड बेकारांची नेमणूक करा’

**खरोशी :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण अव्वल सचिवांच्या ४ नोव्हेंबर २०२५ व शिक्षण संचालक प्रशासन अंदाज व नियोजनांच्या १९ नोव्हेंबर २०२५ च्या परिपत्रकानुसार स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी अनुदानित शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे सेवानिवृत्त झालेल्या वयाच्या ७० वर्षाखालील निवृत्ताना २०,००० रू मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यासाठी स्थानिक जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधीकाऱ्यांनी काढली आहेत. महाराष्ट्र राज्यात सुमारे एक लाखाच्यावर डी.एड, बी.एड प्रशिक्षीत पदवीधर युवक नोकरी विना बेकार आहेत. त्यांची फरपट होत आहे, म्हणून महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद नगरपालिका महानगरपालिका सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने अध्यक्ष शिवानंद भरले व मराठावाडा विभागीय अध्यक्ष सुभाष जिरवनकर यांनी शिक्षण आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह यांच्याकडे समक्ष भेट घेऊन सेवानिवृत्त शिक्षकांना प्रपंचाला हातभार म्हणून महिना ४० ते ६० हजार रुपये पेन्शन मिळतो परंतु राज्यातील डी.एड बी. एड पदविधराचें हाल आहे त्यांची स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेतील रिक्त शिक्षक पदावर २०,००० रू मानधनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करावीत असे मागणी केली आहे. त्याच बरोबर राज्यातील सेवानिवृत्त शिक्षकाचं ८५० कोटी रक्कम ग्रॅज्युटी व पेन्शन विक्री रक्कम गेल्या वर्षभरात सरकारने थकवले आहेत तेही सरकारकडून प्राप्त करून घ्यावी अन्यथा सहा महिन्यापेक्षा जास्त दिवस थकवून रकमेवर बँकेच्या दराने व्याजासाठी उच्च न्यायालयात दाद मागण्यात येईल असेही सांगितले आहे.

## आंबेत हायस्कूलचे एलिमेंटरीत यश



**आंबेत :** सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून रायगड जिल्ह्यातल्या म्हसळा तालुक्यातील सावित्री माध्यमिक विद्यामंदिर आंबेत हायस्कूलचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड दोन्ही परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. गेल्या ३१ वर्षाची परंपरा या शाळेने कायम राखली आहे. एलिमेंटरी ग्रेड परीक्षेत समृद्धी तांबे, सायली साळवी, प्रतिक्षा म्हाप्रळकर, हाफिजा कुणके, अकसा रहाटविलकर, सोहम गजमल हे विद्यार्थी अ श्रेणीत तर अकसा झटाम, दीक्षांत साळवी, युनुस म्हैसकर, मुसा दाभिळकर हे विद्यार्थी ‘ब’ श्रेणीत, प्रतिक गुडेकर ‘क’ श्रेणीत उत्तीर्ण झालेत तसेच इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत नेहा गमरे, निहाल चरफरे ‘अ’ श्रेणीत, केतकी दळवी, रिया खापरे, तेजल बंगाल, कमरुद्दीन चरफरे हे विद्यार्थी ‘ब’ श्रेणीत, कुमारी फरहीन डावरे, सोनाक्षी वाघरे ‘क’ श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. या सर्व विद्यार्थ्यांना कलाशिक्षक लुबाळ यांनी मार्गदर्शन केले असून त्यांच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे व कला शिक्षकांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक सुजित भोसले यांनी कौतुक केले आहे.

## कोमसापचे कळवेत रंगले कविसंमेलन

**उरण :** कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप) पेण शाखेचे पोपटी कवि संमेलन कळवे या गावी शेतामध्ये प्रा.एल. बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. अध्यक्षीय भाषणात प्रा.एल बी यांनी जिल्ह्यात झालेल्या पोपटी संमेलनात केंद्रीय प्रतिनिधी गणेश कोळी, सुरेश वाजेकर, बळीराम भालेकर आणि लवेंद्र मोकल यांच्या योगदानाचे कौतुक केले. यावेळी कोमसाप कोषाध्यक्ष ॲड.गोपाळ शेळके, ज्येष्ठ कवी म. वा. म्हात्रे, नाटककार चंद्रकांत पाटील, कोमसाप उरण अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, जिल्हा प्रतिनिधी एस. एस. पाटील आदी प्रमुखांची उपस्थिती होती. स्वागत प्रास्ताविक पेण शाखाध्यक्ष लवेंद्र मोकल यांनी केले तर सुरेख सूत्रसंचालन प्रकाश ठाकूर यांनी केले. याप्रसंगी म. वा. म्हात्रे, सदानंद ठाकूर, संतोष जोहेकर, म. का. म्हात्रे, अजय शिवकर, रामनाथ पेंटर, डी. एल. पाटील, मोहनलाल म्हात्रे, जनार्दन सताणे, न. ग. पाटील, मनोज म्हात्रे, नरेश पाटील, संतोष ठाकूर, गणेश पाटील, नरेश म्हात्रे, लवेंद्र मोकल, गोपाळ शेळके, साहित्यरत्न प्रा एल.बी. आदी कवींनी कविता सादर केल्या.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव-थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- विकणे आहे : अलिबाग–कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९
- होमस्टे भाड्याने द्यायचे आहे. पत्ता : विजयनगर-वरसोली-नांदे होमगार्ड ऑफिस शेजारी. मो. ७५०७९२९१२८/९४२२४९४५९०
- जागा भाड्याने देणे आहे. चेंढरे अलिबाग येथील स.नं. ८३/२ अलिबाग-चेंढरे बायपास रोड लगत, रॉयल एनफिल्ड शोरूम लगत, पी.एन.पी. शोरूमच्या वरती-बेसमेंट व पहिला मजला सुमारे २५००.०० चौ. फुटाची जागा भाडे तत्वावर देणे आहे. संपर्क : ९८२२०५४७८८
- रिसॉर्टमध्ये कामासाठी एका जोडप्याची आवश्यकता आहे. ठिकाण -सासवणे, संपर्क- +९१९६०७१०२३५७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# ब्रिटिशकालीन ऐतिहासिक वास्तू भग्नावस्थेत

### ।। माणगावच्या जुन्या टपाल कार्यालयाची दुरवस्था ।। नवीन इमारतीची प्रतीक्षा कधी संपणार?

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहराच्या इतिहासाची साक्ष देणारे आणि एकेकाळी परिसराच्या दळणवळणाचा कणा असलेले जुने टपाल कार्यालय आज अक्षरशः मृतप्राय अवस्थेत पडून आहे. ब्रिटिशकालीन वारसा लाभलेली ही वास्तू आज शासनाच्या अनास्थेमुळे आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे भग्नावस्थेत रूपांतरित झाली आहे. भिंती कोसळलेल्या, छप्पर उडालेले, सर्वत्र झाडेझुडपे आणि वेलींनी वेढलेली ही इमारत पाहून कोणत्याही संवेदनशील नागरिकाचे मन हेलावून जाईल, अशीच स्थिती सध्या येथे आहे.



विशेष म्हणजे, टपाल कार्यालय तब्बल ५० वर्षांपासून भाड्याच्या इमारतीत सुरू आहे. वेळेत स्वतःची इमारत उभी न राहिल्याने आजवर लाखो रुपये शासनाला भाड्यापोटी मोजावे लागले आहेत. हा पैसा जर वेळेवर इमारत उभारणीसाठी वापरला असता, तर आज माणगावला सुसज्ज आणि आधुनिक टपाल कार्यालय उपलब्ध झाले असते, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

सध्या माणगावचे टपाल कार्यालय व उपविभागीय टपाल कार्यालय मोरबा रोडवर, माजी आ. अशोक साबळे यांच्या निवासस्थानाच्या मागील बाजूस असलेल्या दोन मजली भाडेकरू इमारतीत कार्यरत आहे. या इमारतीसाठी दरमहा सुमारे ३३ हजार रुपये भाडे दिले जाते. येथून माणगावसह तळा, पाली, म्हसळा आणि श्रीवर्धन या तालुक्यांतील टपाल कार्यालयांचे कामकाज पाहिले जाते. एवढ्या मोठ्या विभागाचा कारभार भाड्याच्या इमारतीतून चालवावा लागणे, ही बाबच शासनाच्या नियोजनशून्यतेचे द्योतक आहे. दरम्यान, जुने माणगाव येथील जिल्हा परिषद मराठी शाळेसमोर असलेले मूळ टपाल कार्यालय सुमारे १५ गुंठे जागेत पसरलेले असून ते पूर्णतः पडीक अवस्थेत आहे. वड, पिंपळाच्या भल्या मोठ्या वेलींनी ही ऐतिहासिक वास्तू अक्षरशः गिळून टाकली आहे. रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना ही ब्रिटिशकालीन वास्तू अस्तित्वात आहे, हेही कळू नये, इतकी ती झाकली गेली आहे. काही ठिकाणी अतिक्रमण झाल्याचेही चित्र दिसून येते. सर्वत्र पाला–पाचोळा, झुडपे आणि भयाण शांतता पसरलेली आहे. या परिस्थितीला जबाबदार कोण, हा प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. शासकीय अधिकाऱ्यांची अनास्था आणि लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्षामुळे माणगावचा हा ऐतिहासिक वारसा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे, सुमारे ८ वर्षांपूर्वी येथील तत्कालीन पोस्टमास्तर स्व. बनेश जोशी यांनी या जागेवर नवीन टपाल कार्यालय इमारत उभारण्यासाठी आवश्यक कागदपत्रे मुंबई व दिल्ली येथील मुख्य कार्यालयांना पाठवली होती. त्या अनुषंगाने जागेचे सर्वेक्षणही करण्यात आले होते. मात्र, तब्बल आठ वर्षे उलटून गेली तरी प्रत्यक्षात एकही वीट रचली गेली नाही. याबाबत अधिक चौकशी केली असता, नव्याने प्रस्ताव दिल्ली येथे पाठवण्यात आला असून सध्या निधीच्या प्रतिक्षेत असल्याचे पनवेल येथील टपाल कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, केवळ प्रस्ताव आणि कागदोपत्री हालचालींमध्ये किती वर्षे घालवायची, असा सवाल आता माणगावकर नागरिक उपस्थित करत आहेत.

> **आधुनिक टपाल कार्यालयाची गरज**
> ऐतिहासिक वास्तूचे जतन करत, त्या जागेवर तातडीने नवीन टपाल इमारत उभारावी, अशी जोरदार मागणी आता नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, उद्याच्या पिढीला माणगावचा हा ऐतिहासिक वारसा फक्त छायाचित्रांतच पाहायला मिळेल, हे मात्र नक्की.

# डॉ. बामणे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन



**। खरोशी । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र हिंदी परिषदच्या ३२व्या अधिवेशनाच्या निमित्ताने विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर येथे दोन दिवसांची राष्ट्रीय संगोष्ठी आयोजित करण्यात आली होती. या संगोष्ठीमध्ये डॉ. देवीदास बामणे लिखित ‘विवेकी राय के कहानियों का विस्तृत अनुशीलन’ या पुस्तकाचे प्रकाशन सोलापूर येथील अहिल्याबाई होळकर विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. इरेश स्वामी यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी डॉ. वसंतराव मोरे, डॉ. चंद्रदेव कवडे, डॉ. पांडुरंग पाटील, डॉ. अनिल काळे, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. माधवी जाधव तसेच अनेक साहित्यिक, हिंदी प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. बामणे हे भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण येथे हिंदी विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते गेली ३२ वर्षे या महाविद्यालयात अध्यापन करत आहेत. या पुस्तकाला पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांनी मनोगत लिहिले आहे. पुस्तकात एकूण १५० कथांचे सखोल व विस्तृत अनुशीलन करण्यात आले आहे. या सर्व कथांमध्ये ग्रामीण समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीचे वास्तव चित्रण दिसून येते.

ग्रामीण भागातील गरीब व श्रमिक समाजाचे दुःख, त्यांची बोलीभाषा, जीवनशैली, खानपान, विवाहसंस्कार इत्यादी पैलूंचे अतिशय सूक्ष्म आणि संवेदनशील वर्णन विवेकी राय यांनी आपल्या कथा–साहित्यात केले आहे. या पुस्तकाबद्दल ॲड. बापूसाहेब नेने, ॲड. मंगेश नेने, बाळासाहेब जोशी, प्रशांत ओक, संजय कडू तसेच इतर पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि डॉ. बामणे यांचे कुटुंबीय यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# निवडणुकीच्या अनुषंगाने पोलिसांचे संचलन

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. त्या करीता कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत रूट मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

सदर रूट मार्च पोलीस ठाणे येथे सुरू होऊन स्वामी नित्यानंद मार्गावरून पनवेल महानगरपालिका मुख्यालय–मौलाना अब्दुल कलाम आझाद चौक–एमजी रोड–मिरची गल्ली नाका–टपाल नाका–कर्नाळा भाजी मार्केट सर्कल– छत्रपती शिवाजी महाराज चौक–आदर्श हॉटेल चौक–लाईन आळी– दांडेकर रुग्णालयासमोरून गावदेवी पाडा मार्गे–व्हिके हायस्कूल येथे समाप्त झाला.

रूटमार्च नंतर व्ही.के. हायस्कूल येथे निवडणूक बंदोबस्त करीता नेमलेल्या अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांना पवन चांडक, निवडणूक निर्णय अधिकारी, प्रभाग क्र.१७,१८,१९,२०, व भाऊसाहेब ढोले, सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, पनवेल, वपोनि नितीन ठाकरे यांनी मतदान दिवशीच्या बंदोबस्ताचे तसेच मतमोजणी प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना दिल्या. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने प्रकाशित करण्यात आलेल्या मार्गदर्शक पुस्तिकांचे वाटप देखील बंदोबस्तावरील सर्व अधिकारी, अंमलदार व होमगार्ड यांना करण्यात आले आहे. बंदोबस्ताच्या अनुषंगाने उपस्थित अधिकारी, अंमलदार, होमगार्ड यांच्या सूचना समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्यात आले आहे. रूट मार्च व मार्गदर्शनानंतर बंदोबस्तावरील ०८ अधिकारी, ११० पोलीस अंमलदार व ८० होमगार्ड हजर होते त्यांना आपापल्या बंदोबस्ताचे ठिकाण व्यवस्थितरित्या समजावून सांगण्यात आले आहे.



# नेरळ स्थानक उद्‍वाहनविना

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वेचे नेरळ स्थानकात फलाट एकवर उभारण्यात आलेले उद्वाहन कधी सुरु होणार असा प्रश्न प्रवासी विचारात आहेत. नेरळ जंक्शन स्थानकाचा कायापालट करण्याचे कार्य सुरु असून नेरळ स्थानकात फलाट एकवर उभारण्यात येत असलेली उद्वाहन अनेक महिन्यापासून कार्यान्वित झालेली नाही. त्यामुळे नेरळ स्थानकातून प्रवास करणारे प्रवासी यांच्याकडून उद्वाहन सुरु केले जात नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.



स्थानकात फलाट दोनवर उद्वाहन असून त्या लिफ्टचा फायदा प्रवासी घेत असतात. मात्र, फलाट एकवर अशी कोणतीही व्यवस्था नव्हती. त्यामुळे नेरळ स्थानकातून प्रवास करणारे प्रवासी यांच्याकडून फलाट एकवर उद्वाहन यंत्रणा बसवण्यात यावी अशी मागणी केली जात होती. माथेरान या पर्यटनस्थळी जाण्यासाठी मुंबई येथून लोकलच्या माध्यमातून येणारे प्रवासी हे फलाट एकवर उतरत असतात. त्यामुळे त्या ठिकाणी उद्वाहन असावे अशी मागणी प्रवासी वर्ग करीत होता. स्थानकाच्या मध्यभागी गेल्या वर्षांपासून उद्वाहन उभारण्याचे काम सुरु होते, मात्र वर्षे झाले तरी उद्वाहन कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे प्रवासी वर्गातून नाराजी व्यक्त होत असून नेरळ स्थानकात अनेक सोयीसुविधा उपलब्ध केल्या जात असताना उद्वाहन सुरु होत नसल्याने ते काम वेगाने व्हावे अशी मागणी नेरळ रेल्वे प्रवासी संघटना करीत आहे. गेल्या वर्षांपासून उद्वाहन उभारण्याचे काम सुरु असून ते उद्वाहन सुरु करण्यात येत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

# ‘सुंदर कोकण’साठी ग्रामस्थ एकवटले

### माणगाव–म्हसळा रोडवरील झाडांचे संरक्षण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

कोकणच्या निसर्गसौंदर्याचे जतन व्हावे, हिरवळ टिकून राहावी आणि सुंदर कोकण ही ओळख अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने मंगळवारी (दि.१३) जानेवारी रोजी माणगाव–म्हसळा रोडच्या दुतर्फा राबविण्यात आलेला वृक्षसंरक्षण व स्वच्छता उपक्रम नागरिकांच्या संवेदनशीलतेचे दर्शन घडवणारा ठरला. रस्त्याच्याकडेला यापूर्वी लावलेली अनेक झाडे कालांतराने तुटली होती.



मात्र शासनामार्फत दोन्ही बाजूंनी नव्याने लावण्यात आलेली झाडे सध्या उत्तमरीत्या वाढत आहेत. असे असतानाही मोर्बे व डोंगरोली परिसरात दरवर्षी उन्हाळ्यात लागणाऱ्या वणव्यांमुळे ही झाडे जळून जाण्याचा धोका कायम असल्याने, या भूमीसाठी काहीतरी केले पाहिजे, या जाणीवेतून मोर्बे, डोगरोली, साई या ग्रामपंचायती पुढे आल्या. या उपक्रमाचे नेतृत्व कोकणचे सुपुत्र, पर्यावरणप्रेमी शौकत रोहेकर यांनी केले. त्यांना राजू मोरे, ग्रामसेवक करडे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी आणि ग्रामस्थांची भक्कम साथ लाभली. तसेच साई ग्रामपंचायतीचे विठोबा मोरे, प्रवीण अधिकारी, रविंद्र अधिकारी, धनाजी येलवे, गफार सोलकर, विष्णू कालप व गावातील महिलांनीही प्रत्यक्ष श्रमदान करून झाडांभोवतालची साफसफाई केली. झाडांच्या संगोपनासाठी अल्ताफ धनसे, अब्दुला महंमद शरीफ हर्णे कर, सैफुल्ला जळगावकर तसेच मोर्बे–साई–डोंगरोली परिसरातील नागरिकांनी सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे.

माणगाव ते साई या मार्गावर लावलेली झाडे सामाजिक माध्यमे, आणि सततच्या देखरेखीच्या माध्यमातून नक्कीच जगवली जातील, असा विश्वास सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांनी व्यक्त केला. यावेळी वनविभागाचे शिंदे, मोरे, सुभेदार, आदी कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांचे आभार मानत, ही वाढलेली झाडे तुमच्या गावाची संपत्ती आहेत. त्यांचे जतन करणे ही सामूहिक जबाबदारी आहे, असे आवाहन केले.

### पोलीस प्रशासनातर्फे तपास मोहीम सुरु | पालकांनी सावधानता बाळगणे आवश्यक

# मुलं पळविण्याच्या अफवांची दहशत

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरणमध्ये लहान मुल व मुली पळवण्याचे प्रमाण वाढत असल्याने पालकांनी सावधानता बाळगणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात लहान मुलं पळवण्याचे, ती बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत आहे, असे एनसीआरबीच्या प्रकाशित झालेल्या आकडेवारीनुसार हे प्रमाण २०२१ ते २०२४ या काळात जवळपास ३० टक्क्यांनी वाढले आहे.

लहान मुलांना पळवून, नंतर त्यांना कामाला जुंपणाऱ्या, त्यांना भीक मागायला लावणाऱ्या आंतरराज्य टोळ्या तयार झाल्या आहेत. या टोळ्या सर्रास लहान मुलं पळवत आहेत आणि यावर सरकार नक्की काय कारवाई करत आहे हेच समजत नाही, असे राज ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.



उरणमध्ये बोरी येथे लहान मुले पळविण्याचा प्रयत्न झाला मात्र स्थानिक नागरिकांनी तो प्रयत्न हाणून पाडला. या संदर्भात उरण पोलीस ठाण्यात बैठक सुद्धा संपन्न झाली आहे. बोरी किंवा उरणमधील इतर भागात खरच मुले पळविणारी टोळी आले आहेत का याचा अधिक तपास करीत असल्याचे तसेच नागरिकांनी कोणत्याही अफवांना बळी पडू नका असे आवाहन उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हानीफ मुलाणी यांनी केले आहे.

> **पालकांनी घ्यावयाची सावधानता**
> ।। मुलांना अनोळखी व्यक्तींसोबत न जाण्याची सूचना करा
> ।। मुलांना घराबाहेर जाण्यापूर्वी पालकांना कळवण्याची सूचना करा
> ।। मुलांना सुरक्षित मार्गाने शाळेत जाण्याची व्यवस्था करा
> ।। मुलांना मोबाइल फोन वापरण्याची सूचना करा आणि त्यांचा वापर कसा करावा हे शिकवा
> ।। मुलांना इंटरनेट सुरक्षिततेबद्दल शिकवा आणि त्यांना अनोळखी व्यक्तींसोबत ऑनलाइन संवाद न साधण्याची सूचना करा

आपल्या परिसरात कोणतेही अनोळखी, संशयांस्पद व्यक्ती आढळून आल्यास त्वरित उरण पोलीस ठाण्यात संपर्क करावे असेही त्यांनी नागरिकांना आवाहन केले आहे. उरणमधील विविध व्हाट्सअप ग्रुपवर लहान मुले चोरल्याचे अनेक संदेश व्हायरल होत आहेत. त्यामुळे उरणमधील जनता मुले पळविण्याच्या या मेसेजने भयभयित झाले आहेत. त्यामुळे सर्वांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन उरण पोलीस ठाण्या मार्फत करण्यात आले आहे. मुले चोरणारी टोळी सक्रिय आहे का याचा तपास पोलीस करीत आहेत. सोशल मीडियावरील अशा व्हायरल संदेशांमुळे राज्यातील अनेक भागांत पालकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण आहे.

## वाघरे स्कूलचे विद्यार्थी यशस्वी

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गणेश यशवंत वाघरे इंग्लिश मिडीयम स्कूलने इंटरमिजिएट व एलिमेंट्री चित्रकला परीक्षेत १०० टक्के निकाल लागला. ग्रेट एः १० विद्यार्थी, ग्रेट बीः १२ विद्यार्थी, ग्रेट सी : ०२ विद्यार्थी, तसेच इंटरमिजिएट चित्रकला परीक्षेत एकूण २३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. ग्रेट एः ०२ विद्यार्थी, ग्रेट बीः २१ विद्यार्थी समाविष्ट आहेत. या दोन्ही चित्रकला परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीच्या परीक्षेत अतिरिक्त दहा गुणांची वाढ मिळते. तसेच मेडिकल, इंजिनिअर प्रवेश मिळण्यासाठी प्राधान्य दिले जाते. याचबरोबरीने जीवशास्त्र आणि इंजिनिअरींग अभ्यासक्रमात या चित्रकला परीक्षेचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे लाभ होतो.

# राजदर्पण दिनदर्शिकेचे अनावरण

**पोलादपूर :** राजदर्पण सेवाभावी संस्थेच्यावतीने 'राजदर्पण दिनदर्शिका २०२६'चे प्रकाशन अत्यंत उत्साहात पार पडले. पोलादपूर येथे छत्रपती श्री शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्यालगत शैलेश पालकर यांच्याहस्ते व नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक नागेश पवार यांच्या वाढदिवसानिमित्त हे प्रकाशन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दर्पण दरेकर, सचिव ओंकार मोहिरे, मुश्ताक मुजावर, गणेश कासुर्डे, अवधूत मोहिरे यांच्यासह प्रवीण पांडे, आदेश गायकवाड, अखिलेश शिंदे, आदित्य गायकवाड, अथर्व शिंदे, सनी विचारे, प्रतीक सुर्वे, महेश निकम, अभिजित साळुंखे नईम धामणकर, नासिरभाई मजगणकर, असिफ चाफेकर व इतर सदस्य उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे भातसई, ता. रोहा, जि. रायगड येथिल ..**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे.आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| श्री.रविंद्र नरहरी म्हात्रे | ३८६ | वरकस ५-३८-०० पो.ख. १-२३-०० एकुण ०६-६१-०० | ४.६९ | खालसा |
| श्री. रविंद्र नरहरी म्हात्रे | ४३१ | वरकस ३-५०-०० पो.ख.०-५०-०० एकुण ४-००-०० | ३.०६ | खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन (१०) दहा दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि.१५/०१/२०२६

सही/-
**अॅड. पी. जी. दाभाडे**
रा. फ्लॅट नं.४०२, बी-बींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ. वागळे हॉस्पिटल जवळ, ता. रोहा,
जि. रायगड पिन नं. ४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे सालवड,ता- कर्जत, जि - रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) भिमसेन शंकर बडेकर, २) मारूती शंकर बडेकर, ३) शांताराम शंकर बडेकर ४) जर्नादन शंकर बडेकर सर्व रा- किरवली, ता-कर्जत जि रायगड याची खालील वर्णन केलेली मौजे सालवड येथील

**जमीन मिळकत तीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६४ | १६/ब | एकुण क्षेत्रफळ - १.०६.०० हे.आर.पॉ. पैकी विकत देत असलेले क्षेत्र ०.४०.०० हे.आर.पॉ | ०.८६ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदर मिळकती पैकी ०.४०.०० हे.आर.पॉ एवढे क्षेत्र कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर संस्थेचाखरेदीखत, साठेकरार, विक्री,, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार अॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक : १५/०१/२०२६

**अॅड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे, नमुद मौजे ताडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) अमर दयाराम माळी, २) योगेश बाळकृष्ण पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे

**मौजे ताडवागळे, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ताडवागळे ता.अलिबाग | ५८/५९/६०/१० | ०-७५-२० पो.ख. ०-१०-०० एकूण ०-८५-२० | १.२२ |

दिनांक: १४/०१/२०२६
अशिलांची सही

**अॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: फ्लॅट नं.१०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली निवासी सदनिका ही मिळकत व त्या निवासी सदनिकेचे मालक /कब्जेदार सौ.रसिका राजन पाटील यांच्याकडून आमचे अशिल कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे व सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरोसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या निवासी सदनिका मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-गोंधळपाडा ता. अलिबाग, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक व उपविभाग ९५/४, या बिनशेती मिळकतीवरील बे वुडस् सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित गोंधळपाडा, पो. वेश्वी, ता. अलिबाग मधील मालमत्ता क्रमांक / सदनिका क्रमांक ८०६ई/३०२, क्षेत्र ५२५ चौ. फुट (४९ चौ. मी.) ग्रामपंचायत वेश्वी ही मिळकत या जाहीर नोटीशीचा विषय आहे.**

वर नमुद केलेल्या सदर निवासी सदनिकेवर कोणाचाही, कसलाही हक्क हितसंबंध, बोजा, गहाण, दान, बक्षिस, लिज, वहिवाट, वारसा, इजमेंट, अदलाबदल, भाडेकरार, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, करार-मदार, दावा, खरेदीखत, साठेकरार, अखत्यारपत्र अगर कुठल्याही प्रकारचा हक्क अगर हितसंबंध अगर अधिकार असल्यास अशा व्यक्तिने आपला हक्क लेखी पुराव्यासहित ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर सर्व संबंधीत कागदोपत्री पुरावा घेऊन खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदरची निवासी सदनिका मिळकत ही पूर्णपणे निर्वेध, निर्जोखमी आहे, असे समजून अथवा कोणाचाही हक्क अगर हितसंबंध असल्यास तो त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही कसलीही तक्रार आल्यास आमच्या अशिलांवर ती बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे.
अलिबाग,
तारीख : १४/०१/२०२६

**अॅड. सागर विजय पाटील**
पत्ता मु. घर नं. १६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ९९२२५६७८९१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमिन मिळकत या मिळकतीचे विद्यमान मालक झुबीन शहारुख कॉन्ट्रक्टर आणि हुतोक्षी झुबीन कॉन्ट्रक्टर रा. मुंबई यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचा आमचे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत आमचे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी सुरु केली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| बहिरोळे ता. अलिबाग जि.रायगड | १७/६ | ०.०२९४ चौ.मी. बिनशेती | २९.६० |

सदर मिळकत व त्यामधील ग्रामपंचायत मापगाव येथील मिळकत क्र. ४२९

सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजारहीत असून या मिळकतीवरील आपली मालकी अबाधित आहे. तसेच सदरची मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणाचीही कसलीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
हे सर्वांस कळविले

अलिबाग
**दि. १४-०१-२०२६**

**सही/-**
**अॅड. सविता शं. पिंगळे**
**२०१, दुसरा मजला सृष्टी बिल्डींग**
**वेधशाळेसमोर ता.अलिबाग जि.रायगड**

दिनांक : /०१/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळिवण्यात येते की खालील वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक **रसिका हरिभाऊ मिसाळ**, यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकती असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे : -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे देऊळवाडी, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग | क्षेत्रफळ हेक्टर आर | आकारणी रू. | पै. |
|---|---|---|---|---|
| ६२/५२ | १ | ०-२९-८६ | ० | ०० |
| | पोटखराबा | ०-००-०० | | |
| | एकुण | ०-२९-८६ | ० | ०० |

प्राप्त परिस्थितीत वरील नमूद केलेल्या जमिन मिळकतींमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी या संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीने खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यांची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**अॅड. सुशांत प्र.घरत**
बी.कॉम.एल.एल. बी.
पत्ता :- फ्लॅट नं. ४०१ व ४०२, चौथा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नं.१०१/३, गार्डन हॉटेल
जवळ, सायन पनवेल हायवेच्या बाजुला, जुना ठाणा नाका,
पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६
Cont. No. ९५९४९९३१४१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळिवण्यात येते की, आमचे अशिल यांनी जमीन मालक मे. ओम पंचरत्न (भागिदारी संस्था) तर्फे भागिदार १) श्री. हनुमंत रामचंद्र शेलार, २) श्रीमती.सुशिला हनुमंत शेलार, ३) श्री.संदीप हनुमंत शेलार आणि ४) श्री. सुधीर हनुमंत शेलार यांच्या सामाईक मालकी हक्कातील, तांबे कब्जातील व वहीवाटीतील मौजे कलोते-मोकाशी (५५३७३१), ता. खालापुर, जि. रायगड, ग्राम महसूल अधिकारी कलोते-मोकाशी, यांच्या हद्दीत आणि उपनोंदणी विभाग आणि तालुका खालापुर, जि. रायगड, महाराष्ट्र येथील बिनशेती जमिन मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या विक्री करण्यात येणाऱ्या बिनशेती जमिन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणेः

**बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे कलोते-मोकाशी (५५३७३१), ता. खालापुर, जि. रायगड**

| भुधारणा पद्धती | सर्व्हे/गट/हिस्सा/ उपविभाग क्रमांक | क्षेत्रफळ (हे. आर. प्रति) |
|---|---|---|
| भोगवटादार वर्ग १ | २८९ | पैकी मुंबई-पुणे महामार्गाकरिता ०-४६-१० संपादित वगळून ०-०१-५ उर्वरित विक्री मिळकत ०-४४-६० (४४६०चौ.मी.) |

तरी या जाहीर नोटीसीने असे कळिवण्यात येते की, वरील मिळकती संदर्भातील समझौताज्ञापन/विक्री करारनामा/साठेखत/खरेदीखत हे आमचे अशिल आणि जमिन मालक यांच्यामध्ये करण्यात येणार आहे, त्यापुर्वी सदरची मिळकत ही निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित व निजोखमी असणे आवश्यक आहे, त्याकरिता जर वरील नमुद केलेल्या जमीन मिळकतीवर अन्यथा कोणाचाही कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध म्हणजेच कोणत्याही व्यक्तिला, देवाणघेवाण, हक्क, व्याज, वाटा, लीज, उप-लीज, भाडेकरार, उप-भाडेपट्टा, परवाना, धारणाधिकार, गहाण, शुल्क, भार, व्यवसाय, करार, ट्रस्ट, आराम, भेट, वारसा, मृत्युपत्र, देखभाल, ताबा, विकास हक्क, राइट ऑफ वे, आरक्षण, करार, लिस-पेंन्डस, कौटुंबिक व्यवस्था/सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचा हुकुम किंवा आदेश, एलएलपी, भागीदारी किंवा इतर कोणत्याही स्वरूपाचे त्यांचे आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत त्यांचे आक्षेप लिखित स्वरूपात पुराव्यानिशी खालील पत्त्यावर नोंदवणे आवशक आहे. या मिळकतीबाबत लिखित स्वरूपात कोणतेही दावे स्वाक्षरीसह, दस्तऐवजासह प्राप्त झाले नाहीत, कोणांकडूनही, कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आली नाही, तर वर नमूद केल्याप्रमाणे नोटीस कालावधीत त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्याचे समर्थन केले जाणार नाही. आणि त्यावर विचार ही केला जाणार नाही तर आमचे अशिल सदर जमिन मिळकतीसंदर्भातील व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी, कळावे.

सही वकील अजीत व्ही. सिंह (खरेदीदारासाठी)
अजीत सिंह अॅण्ड असोसिएटस
(वकील व कायदेशीर सल्लागार)
पत्ताः १६/१७, १ मजला, साई चेंबर,
प्लॉट नं. ४४, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई, ता.आणि जि. ठाणे
फोन नं. ०२२-४००२ ६१४२/९८२०५२३०७७
ई मेल - ajeet_advocate@yahoo.co.in
दिनांक: ../०१/२०२६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक वरुण वाजपेयी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०/८ | ४-१८-०६ | ४२-०० |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १० दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १५/०१/२०२६

**अॅड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

अर्जदाराचे वकील अॅड. संतोष मारुती सापते
**श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात**
अर्ज क्रमांक :- / २०२५

१) श्री. मिलिंद यशवंत भुवड
वय २८ वर्षे, व्यवसाय:- शेती — अर्जदार
रा.मु. पो. जसवली ता. श्रीवर्धन जि. रायगड

विरुद्ध

१) मा. ग्रामविकास अधिकारी तथा जन्म
मृत्यू नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत जसवली
श्रीवर्धन जि. रायगड — सामनेवाला
२) गटविकास अधिकारी पंचायत
समिती श्रीवर्धन
ता. श्रीवर्धन जि. रायगड

सर्व जनतेस या नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मिलिंद यशवंत भुवड हे मु.पो.जसवली ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील

कायमस्वरूपी चे रहिवासी आहेत. अर्जदार यांची आत्या कै. सुलोचना पांडुरंग आदावडे यांचा मृत्यू दिनांक २१-०१-२००९ रोजी मु.पो.जसवली ता. श्रीवर्धन जि. रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांची आत्या कै. सुलोचना पांडुरंग आदावडे ची मृत्यू नोंदीबाबत दाखला मिळण्याकरिता व तशा प्रकारची निर्देश यातील सामनेवाले यांस मा. न्यायालयामार्फत देण्याकरता मा. न्यायालय जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करून मिळण्याकरिता मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदरचा दाखला हा अर्जदार यास शासकीय कामासाठी व इतर खाजगी कामे करण्याकामी हवा आहे. सबब या नोटिसेने कळविण्यात येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत व तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० (तीस) दिवसाच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांची आत्या कै. सुलोचना पांडुरंग आदावडे यांचा मृत्यू दिनांक २१-०१-२००९ रोजी मु.पो.जसवली ता.श्रीवर्धन जि. रायगड येथे झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून तसे मा. न्यायालय संबंधित सामनेवाला यांस निर्देश देतील व इतर कोणाचीही तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

स्थळ :- श्रीवर्धन
दिनांक :- १४/०१/२०२६

सही /-
**मा. कार्यकारी दंडाधिकारी श्रीवर्धन**
**ता. श्रीवर्धन जि. रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित मालक कमला हरिमोहन शर्मा, यांच्या हिश्शातील मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील मिळकती असून, आमचे अशिल यांनी सदर मिळकत खरेदीखत करून विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतींचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे : -

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भिसेगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भूधारणा पद्धती भोगवटदार वर्ग | क्षेत्रफळ हेक्टर आर | आकारणी रू. | पै. |
|---|---|---|---|---|
| ४९/२ | १ | ०-०६-३० | ० | ५३ |
| | पोटखराबा | ०-००-०० | | |
| | एकुण | ०-०६-३० | ० | ५३ |

प्राप्त परिस्थितीत वरील नमूद केलेल्या जमिन मिळकतींमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम. ओ. यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी या संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीने खरेदीखत व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबदल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल यानी तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

**अॅड. सुशांत प्र. घरत**
बी. कॉम. एल. एल. बी.
पत्ता :- फ्लॅट नं. ४०१ व ४०२, चौथा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नं.१०१/२, गार्डन
हॉटेल जवळ, सायन पनवेल हायवेच्या बाजुला,
जुना ठाणा नाका, पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६
Cont. No. 9594993141

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे कोळखे, ता. पनवेल, जि. रायगड येथील, स. नं. १२३, हि.नं. ८ब२, प्लॉट नं.८, क्षेत्र ३०६.५० (चौ.मी.) आकार रू ५-३७ पैसे, या मिळकतीवरील वास्तु विहार अे बी सी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, बी विंग मधिल तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ३०२/ बी, क्षेत्र ६४० चौरस फूट, जिचा ग्रामपंचायत कोळखे कडील मालमत्ता क्र.७३२/१४ असा असून सदर निवासी सदनिका श्री.मोहन किसन खोमणे, राहणार मोहपाडा, चांभार्ली, ता. खालापूर, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर सदनिका पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १४/०१/२०२६

सही/
**(अॅड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदाराचे वकील

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. मोहन अनंत भोईर व श्री. संदीप लडकु भोईर याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नसरापूर, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ३३/१७ एकुण ०.२३.०० गुंठे, जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : १५/०१/२०२६

**अॅड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी : ९०२८५९२७९८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे वदप आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या बिनशेती मिळकतीचे मालक अर्चना राजीव कुलकर्णी व राजीव भीमसेन कुलकर्णी यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|
| १०/७ | ४-१८-०६ | ४२-०० |

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार अॅडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १५/०१/२०२६

**अॅड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९,कोर्ट व्ह्यू
बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व
फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली बागायत जमिन मिळकत ऑलिस थॉमस, राहणार मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील ऑलिस थॉमस, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव, ता.अलिबाग, | ४७९ | ०-०९-८० ०-००-२० पो.ख. ०-१०-०० एकूण | २-५६ |

अलिबाग,
दिनांक : १४/०१/२०२६.

सही/
**(अॅड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड,
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत त्यांच्या मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे -वर्णे, तालुका - कर्जत, जि. - रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| श्री.राजेंद्र अप्पा पाटील | २७ | ५/ब | ७३.०० पैकी खरेदी देणार यांच्या मालकीची १८.२५ गुठे क्षेत्र मिळकत | ७३०-०० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकतीच्या कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थाचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा कोणत्याही व्यक्तींची अगर संस्थांची आमच्या अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत पुराव्यासोबत लेखी स्वरूपात हरकत कळवावी, वरील मूदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील जमिन मिळकतीशी कोणत्याही व्यक्तींचा अगर संस्थांचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, तसेच कोणत्याही व्यक्तीची अगर संस्थांची आमचे अशिलांच्या वर वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत नाही किंवा असल्यास ती हरकत त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेली आहे असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणीही हरकत घेतल्यास ती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. १४/०१/२०२६

अधिवक्ता
**शैलेश दत्तात्रेय पवार**
पत्ता. घर क्र. ३, नेमीनाथ हाईट्स शेजारी,
मुद्रे बु. कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड,
मो. ९५९५२११८६७

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे सालवड,ता- कर्जत, जि - रायगड येथील शेती जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक १) भिमसेन शंकर बडेकर, २) मारूती शंकर बडेकर, ३) शांताराम शंकर बडेकर ४) जर्नादन शंकर बडेकर सर्व रा- किरवली, ता - कर्जत जि - रायगड याची खालील वर्णन केलेली मौजे सालवड येथील

**जमीन मिळकत तीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ आर.चौ.मी | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ६४ | १६/ब | एकुण क्षेत्रफळ - १.०६.०० हे.आर.पॉ. पैकी विकत देत असलेले क्षेत्र ०.४६.०० हे.आर.पॉ | ०.८६ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक यांनी आमचे आशिलास सदर मिळकती पैकी ०.४६.०० हे.आर.पॉ एवढे क्षेत्र कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच या इसमाचा अगर सथचाखरेदीखत, साठेकरार, विक्री,, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन चौदा (१४) दिवसांचे आत खाली सही करणार अॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहाणार नाही हे कळावे.

दिनांक : १५/०१/२०२६

**अॅड भारत अंकुश सांवत**
(बी कॉम.एल.एल.बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता- कर्जत जि - रायगड
संपर्क क्रंमाक ९५५२२९६६२२

# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागि[illegible] नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# न्यूझीलंडसमोर २८५ धावांचे लक्ष्य

## ।। राहुलचं नाबाद शतक ।। रोहितसह कोहली आणि अय्यर स्वस्तात आटोपले





**। राजकोट । वृत्तसंस्था ।**

राजकोटच्या मैदानात केएल राहुलच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर भारतीय संघाने पाहुण्या न्यूझीलंड संघासमोर २८५ धावांचे टार्गेट सेट केले आहे. न्यूझीलंडच्या संघाने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. भारतीय संघाच्या आघाडीच्या फलंदाजांना स्वस्तात माघारी धाडत न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी कर्णधार ब्रेसवेलचा निर्णय सार्थ ठरवला.

संघ अडचणीत असताना लोकेश राहुल याने आपल्या फलंदाजीतील क्लास दाखवला. पाचव्या क्रमांकावर मैदानात आल्यावर सुरुवातीला संयमी खेळी करत त्याने डावाला आकार दिला. त्यानंतर गियर बदलून फलंदाजी करत त्याने निर्धारित ५० षटकात संघाच्या धावफलकावर ७ विकेट्सच्या मोबदल्यात २८४ धावा लावल्या.

शुभमन गिलच अर्धशतक, रोहितसह कोहली आणि अय्यर स्वस्तात आटोपले

पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाने रोहित शर्माच्या रुपात ७० धावांवर पहिली विकेट गमावली. हिटमॅन ३८ चेंडूचा सामना करून २४ धावांवर बाद झाला. कर्णधार शुभमन गिलनं अर्धशतकाला गवसणी घातली. पण संघाच्या धावफलकावर १०० धावा लागण्याआधीच त्यानेही विकेट गमावली.

गिलनं ५३ चेंडूत ९ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५६ धावांची खेळी केली. श्रेयस अय्यरनेही १७ चेंडूचा सामना करून ८ धावांवर आपली विकेट गमावली. कमालीच्या फॉर्ममध्ये असलेला विराट कोहली अवघ्या २३ धावा करून माघारी फिरला. भारतीय संघाने ११८ धावांवर ४ विकेट्स गमावल्या होत्या.

**जड्डूसह नितीश कुमार रेड्डीसोबत अर्धशतकी भागीदारी**

संघ अडचणीत असताना लोकेश राहुलनं रवींद्र जडेजाच्या साथीनं पाचव्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी रचली. दोघांनी ८८ चेंडूत ७३ धावांची भागीदारी केली. ही या सामन्यातील कोणत्याही विकेट्समधील सर्वोच्च भागीदारी देखील ठरली. जड्डू ४४ चेंडूत २७ धावा करून बाद झाल्यावर लोकेश राहुलनं युवा अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीसह सहाव्या विकेटसाठी ४९ चेंडूत ५७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचली. नितीश कुमार रेड्डीनं २१ चेंडूत २० धावांचे योगदान दिले.

लोकेश राहुलनं शेवटपर्यंत मैदानात थांबत ९२ चेंडूत ११२ धावांसह भारतीय संघाच्या धावफलकावर आव्हानात्मक धावसंख्या लावली. न्यूझीलंडच्या संघाकडून क्रिस्टियन क्लर्क याने सर्वाधिक ३ विकेट्स घेतल्या. याशिवाय झॅक फॉल्केस,जयडेन लेनक्स आणि मायकेल ब्रेसवेल यांनी प्रत्येकी एक-एक विकेट आपल्या खात्यात जमा केली.

---

# निवडक

## पिल्लईत ॲथलेटिक्स निवड चाचणी

**रसायनी :** भारतीय खेल प्राधिकरण अंतर्गत खेलो इंडिया सेंटर, महात्मा एज्युकेशन सोसायटीचे पिल्ले एचओसी इंटरनॅशनल स्कूल, रसायनीत ॲथलेटिक्स व व्हॉलीबॉल या खेळांसाठी वर्ष २०२६-२७ साठी निवड चाचणी ठेवण्यात आली आहे. ही निवड चाचणी ३ ते ४ फेब्रुवारी रोजी खेलो इंडिया सेंटर, एचओसी इंटरनॅशनल स्कूलच्या मैदानावर आयोजित केली आहे. तरी वयोगट १० ते १६ वर्ष वय असलेल्या मुला मुलींना या खेळांमध्ये विविध जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर मिळालेल्या प्रमाणपत्रांसह सकाळी ०८:३० वाजता आपल्या मुळ जन्म तारखेचा दाखला, रहवासी दाखला, आधार कार्ड आणि यांचे ०२ झेरॉक्स सेट तसेच पासपोर्ट साईज ०५ फोटो घेऊन एचओसी इंटरनॅशनल स्कुलचे मैदान येथे उपस्थित राहावे. यासाठी पत्ता पिल्ले एचओसी. एज्युकेशनल कॅम्पस, एचओसी. इंटरनॅशनल स्कूल, रसायनी, तालुका-खालापूर, जिल्हा रायगड ४१०२०७ आहे. निवड झालेल्या खेळाडूंना महात्मा एज्युकेशन संस्थेकडून निवासाची व जेवणाची व्यवस्था करण्यात येईल तसेच मोफत प्रशिक्षण, क्रीडा स्पर्धा भत्ता, खेळाचे साहित्य हे स्पोर्टस ऑथॉरिटी ऑफ इंडियाकडून मिळेल. तरी य संधीचा इच्छुक खेळाडूंनी लाभ घ्यावा,असे आ-वाहन एचओसी पिल्लई कडून करण्यात आले आहे. यासाठी कृष्णा पाटील (ॲथलेटिक्स कोच)-९७६५६३१४७७, अनु कृष्णन (ॲथलेटिक्स कोच) - ६२८२४४८२२४, मनोज सिगु (व्हॉलीबॉल कोच)-८३६९४५२९५० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## गावदेवी चषक क्रिकेट सामन्यांचे आयोजन

**सुतारवाडी :** प्रति वर्षाप्रमाणे २४ व २५ जानेवारी रोजी सकाळी नऊ ते सायंकाळी साडेपाच पर्यंत नवतरुण विकास मित्र मंडळ जावटे आयोजित भव्य गावदेवी चषक २०२६ खुळे ओव्हर आर्म क्रिकेट सामन्यांचे आयोजन केले असून प्रथम क्रमांकास रु.५०,००१ व आकर्षक चषक, द्वितीय क्रमांकास रू.३०,००१ तृतीय क्रमांकास रू.१५,००१ व आकर्षक चषक, चतुर्थ क्रमांक रु.७,००१ व आकर्षक चषक, तसेच उत्कृष्ट फलंदाज, उत्कृष्ट गोलंदाज, व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक यांना उत्तेजनार्थ चषक देण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. सदरील सामने जावटे येथील भोसले मैदानात संपन्न होणार असून स्पर्धकांना नियम व अटी लागू असतील. हे भव्य दिव्य सामने यशस्वी करण्यासाठी नवतरुण विकास मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी विशेष मेहनत घेत असून अधिक माहितीसाठी, दिपेश ९७६७९५८५९४, प्रशांत.९९३०८३१८३४, चेतन ८०९७५७९५९६. आणि अमोल ९५२७९६६८१६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## राज्य क्रीडा दिनाचे आयोजन

**रायगड :** ऑलिम्पिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्म दिनानिमित्त रायगड जिल्ह्याचा राज्य क्रीडा दिन १५ जानेवारी रोजी पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे सायंकाळी ५.०० वाजता साजरा करण्यात येणार आहे. या राज्य क्रीडा दिनी रायगड जिल्ह्यातील सन २०२५-२६ मध्ये सर्व राष्ट्रीय, राज्य क्रीडा पुरस्कारार्थी, आंतरराष्ट्रीय पदक विजेते खेळाडू तसेच राष्ट्रीय शालेय पदक विजेते खेळाडू यांना विविध मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व दिवंगत खाशाबा जाधव यांच्या क्रीडा कामगिरी व कार्याचा परिचय होण्यासाठी त्यांच्या जीवनावर आधारीत पुस्तकाचे वितरण केले जाणार आहे. या राज्यस्तरीय कार्यक्रमास खेळाडू आणि क्रीडा प्रेम ींनी मोठ्या प्रमाणात सहभागी, व्हावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले आहे.वतंत्र भारताचे पहिले ऑलिम्पिक पदक विजेते म्हणून ज्यांचा संपूर्ण भारताला अभिमान आहे असे महाराष्ट्राचे सुपुत्र दिवंगत खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिकमध्ये केलेल्या कामगिरीचा गौरव व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रेरणा व प्रोत्साहन मिळण्यासाठी त्यांचा जन्मदिन दि.१५ जानेवारी, हा राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्याकरिता शासनाने मान्यता दिली आहे.

## साताऱ्याचे खेळाडू भारतीय संघात

**नागठाणे :** एप्रिल महिन्यात होणाऱ्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेसाठी साताऱ्याच्या चार खेळाडूंचा समावेश एकाच वेळी भारतीय तिरंदाजी संघात झाला आहे. जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे.साहिल जाधव, ओजस देवतळे, मधुरा धामणगावकर अन् आदिती स्वामी हे ते खेळाडू आहेत. कोलकत्ता येथील स्पोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया तसेच नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स येथे काल आयोजिण्यात आलेल्या निवड चाचणीतून आठ भारतीय खेळाडूंचा संघ निवडण्यात आला. त्यात चार सातारकर खेळाडू आहेत. ज्योती सुरेखा वेन्नम (आंध्र प्रदेश), प्रगती (दिल्ली), कुशल दलाल (हरियाना), अभिषेक वर्मा (दिल्ली) या अन्य खेळाडूंचीही निवड भारतीय संघात झाली आहे.जागतिक तिरंदाजी स्पर्धेची पहिली फेरी सात ते १२ एप्रिलदरम्यान मेक्सिको येथे होणार आहे. पाच ते १० मेदरम्यान चीनमधील शांघाय चीन येथे दुसरी फेरी होणार आहे. साताऱ्यातील चारही खेळाडू कंपाउंड राउंड प्रकारात सहभागी होणार आहेत. सध्या हे सर्व खेळाडू साताऱ्यातील दृष्टी आर्चरी ॲकॅडमीमध्ये आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक प्रवीण सावंत, सहाय्यक प्रशिक्षक शिरीष ननावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहेत.

## अल्फियाला बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्ण

**नागपूर :** नागपूर विभागासाठी अभिमानास्पद ठरणारी कामगिरी करत मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात तिकीट तपासनीस म्हणून कार्यरत असलेल्या अल्फिया पठाण हिने ९ व्या एलिट सीनियर राष्ट्रीय पुरुष व महिला बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. उत्तर प्रदेशातील नोएडा येथे नुकत्याच पार पडलेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत भारतीय रेल्वेचे प्रतिनिधित्व करताना अल्फियाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. अंतिम फेरीत हरियाणाच्या बलाढ्य प्रतिस्पर्धी खेळाडूचा पराभव करत अल्फियाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. या विजयामुळे केवळ भारतीय रेल्वेच नव्हे, तर विशेषत: मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचा नावलौकिक राष्ट्रीय पातळीवर वाढला आहे. खेळातील तिची चिकाटी, तांत्रिक कौशल्य आणि आत्मविश्वास यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.अल्फियाच्या या यशामागे संघर्षाची आणि जिद्दीची दीर्घ कहाणी आहे. २०१४ साली प्रदर्शित झालेल्या महिला बॉक्सर मेरी कॉम यांच्या जीवनावर आधारित चित्रपटाचा तिच्यावर खोल परिणाम झाला. त्याच काळात प्रशिक्षक पुरोहित यांनी दाखवलेला विश्वासही तिच्यासाठी निर्णायक ठरला. तो चित्रपट पाहिल्यानंतर मला वाटले की आपणही हे करू शकतो,असे अल्फिया सांगते.

---

# मास्टर्स कप राष्ट्रीय कराटे स्पर्धा संपन्न

## महाराष्ट्राला ३ सुवर्ण, ५ रजत, ९ कांस्यपदके



**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

केरळ येथे दिनांक १० व ११ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या मास्टर्स कप २०२६ या राष्ट्रीय कराटे स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंनी दमदार कामगिरी करत तीन सुवर्ण, पाच रजत, नऊ कांस्यपदके पटकावल्याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

मास्टर्स कप २०२६ ही राष्ट्रीय कराटे स्पर्धा नुकत्याच केरळ राज्यात वायनाड जिल्ह्यातील सुलतान बत्तेरी येथे संपन्न झाली. यात महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील १० कराटेपटूंची निवड करण्यात आली होती यामध्ये महाराष्ट्राने दमदार कामगिरी करत तीन सुवर्ण, पाच रजत आणि नऊ कांस्य पदके पटकावली. यात एचओसी एल पिल्लई रसायनी स्कूलच्या विद्यार्थीनी शर्वरी तांबडकर दोन सुवर्णपदके, ईश्वरी तांबडकर १ रजत , १ कांस्यपदक, व त्रिशा गट्टू १ रजत, १ कांस्यपदक फटकावले.

जवाहर नवोदय विद्यालयाच्या ध्रुव शिल्पा कळके १ सुवर्ण, १ कांस्यपदक, अंजुमन इस्लाम उर्दू स्कूलचा अब्दुल रहमान कामिल कापसेला १ रजत पदक तसेच छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात शिकणारे काव्या नाक्ती १ रजत, १ कांस्यपदक, रेश्मा भोईर २ कांस्यपदक, आर्यन गद्रे १ कांस्यपदक आणि जय ठाकूर १ कांस्यपदक यांनी पटकाविले.

## लक्ष्य सेनचा आयुष शेट्टीविरुद्ध विजय

**नवी दिल्ली :** माजी विजेता लक्ष्य सेन, सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील विजेत्या ट्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी त्यांच्या इंडिया ओपन २०२६ मोहिमेची दमदार सुरुवात केली. चायनीज तैपेईचा चौथा मानांकित चाऊ टिएन चेन, जपानचा सातवा मानांकित कोदाई नारोका आणि फ्रान्सचा सहावा मानांकित ॲलेक्स लॅनिएर यांना स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत बाहेर जावे लागले. भारतीय बॅडमिंटन संघटनेद्वारे आयोजित एचएसबीसी बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर सुपर ७५० स्पर्धेचे सामने इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये खेळवले जात आहेत. लक्ष्यला अकादमीतील सहकारी शेट्टीवर २१-१२, २१-१५ असा विजय मिळवण्यासाठी ३६ मिनिटे लागली.

## राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांचे यश



**। भाकरवड । प्रतिनिधी ।**

तालुक्यातील ग्रामपंचायत पोयनाड हद्दीतील भाकरवड गावची सिद्धीका मंदार पाटील सुहित जीवन ट्रस्ट, पेण, रायगड येथील बौद्धिक अक्षम्य (मतिमंद) विद्यार्थ्यांनी स्पेशल ओलंपिक भारत महाराष्ट्र व जिल्हा सक्षमीकरण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ॲथलेटिक्स स्टेट लेव्हल चॅम्पियनशिप २०२६ आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश संपादन केले.

शनिवार व रविवार, दिनांक १० व ११ जानेवारी २०२६ रोजी नागपूर, रामटेक येथे या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. संपूर्ण महाराष्ट्र राज्यामधून ३६ जिल्ह्यातील विविध विशेष शाळांमधील एकूण ३२० विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेत सुहित जीवन ट्रस्टच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत उल्लेखनीय आणि देदिप्यमान कामगिरी केली आहे.

हीसर्व विद्यार्थी बौद्धिकदृष्ट्या अक्षम (मतिमंद) आहेत. मनीष म्हात्रे याने २०० मी. धावणे (सुवर्ण पदक), अर्जुन वारे याने २०० मीटर धावणे (रौप्य पदक), सिद्धीका पाटील हिने ५० मी. धावणे (सुवर्ण पदक), आर्या पाटील हिने २०० मी. धावणे (सुवर्णपदक) व ४०० मी. धावणे (रौप्य पदक) असे एकूण ३ सुवर्ण व २ रौप्य पदके मिळवून रायगड जिल्ह्याचा व संपूर्ण महाराष्ट्रात संस्थेचा गौरव वाढविला आहे. अशा प्रकारच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कौशल्य दाखवत भरघोस यश संपादन केले.

सुहित जीवन ट्रस्टमधील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर क्रीडा मैदानात आपली चमकदार छाप सोडली आहे. स्पर्धांमध्ये त्यांनी दाखवलेली कामगिरी ही त्यांच्या क्षमतेची आणि सातत्यपूर्ण सरावाची जणू जीवरस घोषणाच होती.

या उल्लेखनीय यशामागे, विद्यार्थ्यांचे पालक, संस्था तसेच क्रीडा प्रशिक्षक अमोल काईनकर व प्रीती म्हात्रे, प्रिन्सिपल डॉ. सुरेखा पाटील यांचे मार्गदर्शन व पाठबळ अतिशय मोलाचे ठरले आहे. विद्यार्थ्यांच्या या चमकदार कामगिरीमुळे समाजातील सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून संस्थेचा गौरव उंचावला आहे.

## वैभवला एकदाच वर्ल्डकप खेळता येणार

**नवी दिल्ली :** १९ वर्षांखालील वर्ल्ड कप स्पर्धेला गुरुवारपासून सुरुवात होत आहे. भारताला पहिल्याच सामन्यात अमेरिकेचा सामना करावा लागणार आहे. या स्पर्धेची चर्चा होण्याचं कारण, १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी आहे. १४ वर्षीय वैभव हा भारतीय संघातील सर्वात लहान सदस्य आहे आणि २०२८ पर्यंत तो १६ वर्षांचा होईल, म्हणजेच तो पुढील वर्ल्डकप स्पर्धेसाठीही पात्र ठरू शकतो. पण, बीसीसीआयच्या नवीन नियमामुळेत्याला १९ वर्षांखालील एकच वर्ल्ड कप खेळता येणार आहे. बीसीसीआयने २०१६ मध्ये निर्णय घेतला की कोणताही खेळाडू एकापेक्षा जास्त १९ वर्षांखालील वर्ल्ड कप स्पर्धेत सहभागी होणार नाही. राहुल द्रविड भारताच्या १९ वर्षांखालील संघाचे प्रशिक्षक असताना हा नियम लागू करण्यात आला होता.

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक

# मतदान जनजागृतीसाठी धावले पनवेलकर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जनजागृतीच्या उद्देशाने निवडणुक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली कामोठे येथे भव्य मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. मतदान जनजागृतीसाठी आयोजित या ५ किलोमीटर मॅरेथॉनमध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. या उपक्रमात के.एल.ई. कॉलेज कळंबोली, सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर ज्युनिअर कॉलेज, कामोठे येथील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.यावेळी मतदानाच्या प्रतिज्ञेने मॅरेथॉनची सुरूवात झाली.

माझे मत, माझा अधिकार, लोकशाही मजबूत करूया अशा घोषणांसह विद्यार्थ्यांनी धाव घेत नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. यावेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, जनसंपर्क अधिकारी नितीन साके, अनिल कोकरे, विविध महाविद्यालयांचे संबधित शिक्षक उपस्थित होते. याचप्रमाणे पिल्लई महाविद्यालयामध्ये देखील मतदान जनजागृतीसाठी नुकतीच वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले.



### अभिरूप मतदान केंद्रातून प्रथम मतदारांना धडे

सीकेटी महाविद्यालयामध्ये पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अभिरूप मतदान केंद्राचा अभिनव उपक्रम पनवेल महानगरपालिकेच्या स्वीप कार्यक्रमाच्या माध्यमातून सोमवारी राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाने विद्यार्थी सहभागातून उत्स्फूर्तपणे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची माहिती प्रथम मतदारांना होण्यासाठी प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून सादरीकरण केले. यामध्ये उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेपासून ते अंतिम मतमोजणी, विजयी उमेदवाराची घोषणा या सर्व बाबींचे नाट्यमय सादरीकरण केले. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा आणि उत्साह निर्माण होत आहे.

---

## ऑल इंडिया शूटिंग बॉल चॅम्पियनशिप स्पर्धा | राष्ट्रीयस्तरावर खेळणारी जिल्ह्यातील पहिली महिला

# मांडवखारची 'आभा' करतेय मुंबईचे प्रतिनिधित्व



**। रायगड । प्रतिनिधी ।**

'मुलाचे पाय पाळण्यात दिसतात' अशी एक म्हण प्रचलित आहे. या म्हणीला साजेशे उदाहरण अलिबाग तालुक्यातील मांडवखार गावातील धैर्यवान महिला खेळाडूचे आहे. वडिलांचा क्रीडा क्षेत्रातील पराक्रम पाहत रांगणारी आभा आता शूटिंग बॉलच्या मैदानात आपल्या पदलालित्याने आणि कडक माऱ्याने लक्ष वेधून घेत आहे.

आपल्या खेळाच्या जोरावर तालुका, जिल्हा, राज्य नव्हे थेट राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या ऑल इंडिया शूटिंग बॉल चॅम्पियन स्पर्धेसाठी आभा म्हात्रेची यांची निवड झाली आहे. आभाने सोलापूर माळशिरस येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये मुंबई संघाचे प्रतिनिधित्व केले.

अलिबाग तालुक्यातील मांडवखार गावातील आभा जितेंद्र म्हात्रे या शूटिंग बॉल खेळाच्या मैदानावर चमकणाऱ्या ताऱ्याने निवड समितीचे लक्ष वेधले हे तिलादेखील कळले नाही. शूटिंग बॉल खेळाचे असणारे नियम आणि त्याचे मार्गदर्शन अर्थात शूटिंग बॉलचे बाळकडू आभाला तिच्या घरातूनच मिळाले आहे. आभाचे वडील विद्युत क्रीडा मंडळ मांडवखार शूटिंग बॉल संघाचे ज्येष्ठ खेळाडू आणि कर्णधार आहेत. आजही शूटिंग बॉल स्पर्धांमध्ये जितेंद्र म्हात्रे यांचा जलवा पाहावयास मिळतो.

### मांडवखारच्या तीन खेळाडूंवर निवड समितीची नजर

विद्युत क्रीडा मंडळ मांडवखार या संघाने अनेकदा आपले शूटिंग बॉल स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. मांडवखार गावचा जम्प शुटर परेश मोकल हा आपल्या खेळाच्या जोरावर महाराष्ट्राच्या संघात सिलेक्ट झाला आहे. त्यापाठोपाठ मांडवखार संघाचा उत्कृष्ट लिफ्टिंग खेळाडू रत्नेश मोकल आणि आभा म्हात्रे यांचेदेखील मुंबई युनिटमध्ये निवड झाली आहे. हे सर्व खेळाडू आपापल्या संघाचा नावलौकिक वाढविण्याबरोबर अलिबाग तालुक्याचे नाव देशपातळीवर झळकावत आहेत.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)